सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. ०२ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२१ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## उपराष्ट्रपतीपदासाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान

### निवडणूक आयोगाने केली मोठी घोषणा

नवी दिल्ली : जगदीप धनखड यांनी तब्येतीचे कारण देत उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला. यानंतर उपराष्ट्रपतीपदासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. धनखड यांनी २१ जुलै रोजी राजीनामा दिला. यानंतर निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची तारखी जाहीर केली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी उपराष्ट्रपती या पदासाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार असल्याचे सांगितले. याआधी ९ ऑगस्टच्या शनिवारपासून उपराष्ट्रपती या पदासाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची मुदत २१ ऑगस्ट रोजी संपणार आहे.

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना गुरुवार ७ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. उपराष्ट्रपती या पदासाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दिवस हा गुरुवार २१ ऑगस्ट २०२५ हा असेल. उमेदवारी अर्जांची छाननी शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस हा सोमवार २५ ऑगस्ट २०२५ हा असेल. आवश्यकता असल्यास मतदान मंगळवार ९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत होणार आहे. मतमोजणी आवश्यकता असल्यास मंगळवार ९ सप्टेंबर २०२५ रोजी मतदान पूर्ण झाल्यानंतर होणार आहे.

**उपराष्ट्रपती या पदासाठी आवश्यक पात्रता**

उमेदवार भारतीय नागरिक असणे आवश्यक, उमेदवाराचे वय किमान ३५ वर्षे असावे, उमेदवार राज्यसभा सदस्य होण्यास पात्र असावा, उमेदवाराने कोणत्याही राज्य किंवा केंद्र सरकारच्या अंतर्गत कोणतेही लाभाचे पद (जसे की सरकारी नोकरी) धारण करू नये.

संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत मतदान करतात. मतदान करणाऱ्यांमध्ये राष्ट्रपतींनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचाही समावेश असतो. गुप्त पद्धतीने मतदान होते. खासदार उमेदवारांना त्यांच्या प्राधान्यानुसार रँकिंग देतात. प्रथम पहिल्या पसंतीची मते मोजतात यातून विजयी उमेदवार निश्चित झाला नाही तर दुसऱ्या पसंतीची मते मोजली जातात. दुसऱ्या पसंतीची मते मोजूनही विजयी उमेदवार निश्चित झाला नाही तर तिसऱ्या पसंतीची मते मोजली जातात. ही प्रक्रिया विजयी उमेदवाराची घोषणा होईपर्यंत सुरू राहते. निवडणूक निकालाविषयी वाद झाल्यास निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येते. आयोगाने दिलेला निर्णय अमान्य असल्यास सर्वोच्च न्यायालय हा शेवटचा पर्याय उपलब्ध आहे.

## माझी प्रतिष्ठा वाढवणारा पुरस्कार : नितीन गडकरी

पुणे, १ ऑगस्ट : काही पुरस्कार व्यक्तीची प्रतिष्ठा वाढतात, तशीच माझी प्रतिष्ठा वाढवणारा पुरस्कार मला मिळाला असल्याबद्दल अतिशय आनंद झाला असल्याचे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले आहे.

४३ वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना आज प्रदान करण्यात आला. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टिळक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि एक लाख रपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. १९८३ पासून आजपर्यंत पुरस्कारार्थी ठरलेल्या व्यक्तीवर आधारित पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी करण्यात येते.

देशात विश्व गुरू बनण्याची क्षमता आहे. येणाऱ्या काळात देशात सर्वाधिक तरुण, गुणवान तंत्रज्ञ तयार होत आहे. आत्मविश्वास, सकारात्मकता कायम राखल्यास लोकमान्य टिळकांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न सत्या त उतरेल असा आशावाद नितीन गडकरी यांनी आज पुण्यात पुरस्काराला उत्तर देताना व्यक्त केला.

लोकमान्य टिळकांसारखा बाणा असणारे नितीन गडकरी हे केवळ नेते नाहीत तर संशोधक आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पक्षीय राजकारणापेक्षा विकासाचे राजकारण करत देशात रस्ते, महामार्ग, पूल यांचे जाळे भक्कम करत देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नितीन गडकरी यांच्या कार्याचा गौरव केला.

याप्रसंगी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचे जे स्वप्न पाहिले आहे त्याच्या शिल्पकरांपैकी नितीन गडकरी एक आहेत.

## दत्तात्रय भरणेंकडे कृषी मंत्रीपदाचे धुरा तर माणिकराव कोकाटेंना क्रीडा मंत्रीपद

मुंबई, ०१ ऑगस्ट : विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान मोबाईलवर कथितपणे पत्ते खेळण्याचा आरोप झालेले माणिकराव कोकाटेंचे कृषी खाते काढण्यात आले. त्याऐवजी दत्तात्रय भरणे यांच्याकडे कृषी खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

कृषि मंत्री माणिकराव यांना त्याच्या मंत्रिपदावरून काढून क्रीडा मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. तर दत्तात्रेय भरणे यांच्याकडे कृषिमंत्री पद सोपवण्यात आले. माणिकराव कोकाटे यांची कृषिमंत्रीपदाची आतपर्यंतची कारकीर्द खूपच वादग्रस्त होती. त्यांनी केलेल्या अनेक विधानांमुळे वाद निर्माण झाला होता. तशातच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडल्या जाणाऱ्या विधीमंडळात महत्त्वाची चर्चा सुरू असताना, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे मोबाईलवर रमी गेम खेळत बसले होते. त्याचा कथित व्हिडीओ



व्हायरल झाला आणि त्यानंतर सोशल मीडियावरून माणिकराव कोकाटेंवर टीकेची झोड उठली होते. तेव्हापासून कोकाटे यांना पदावरून दूर करा, अशा मागणी जोर धरू लागली होती.

इंदापूरचे आमदार आणि राज्याच्या मंत्रिमंडळातील कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे हे महाराष्ट्राचे नवे कृषिमंत्री असतील.दत्तात्रय भरणे यांच्याकडे क्रीडा व युवक कल्याण, तसंच अल्पसंख्यांक मंत्रालयाची जबाबदारी होती. यातील क्रीडामंत्रिपदाची जबाबदारी काढून घेण्यात आली असून, ती जबाबदारी माणिकराव कोकाटेंकडे देण्यात आली आहे. दत्तात्रय भरणे हे अजित पवारांचे निकटवर्तीय मानले जातात. राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) काँग्रेस पक्षाच्या हर्षवर्धन पाटील यांचा पराभव करून दत्तात्रय भरणे पुण्यातील इंदापूर विधानसभा मतदारसंघातून विधानसभेत पोहोचले आहेत.दत्तात्रय भरणे इंदापूरमधून तिसऱ्यांदा विजयी झाले आहेत. महाविकास आघाडीचं सरकार असताना, उद्धव ठाकरेंच्या मंत्रिमंडळात भरणेंकडे राज्यमंत्रिपदाची जबाबदारी होती.

त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट निर्माण झाले आणि भरणे हे अजित पवारांसोबत राहिले. त्यावेळी पुन्हा भरणेंचा मंत्रिमंडळात समावेश झाला आणि त्यांच्याकडे कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले होते. पुढे २०२४ साली महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतरही भरणेंना कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले.






## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्रीमती. आर. एस. तापडिया मॅडम) यांच्या कोर्टात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र– ३४२/२०२५ पु.तारीख : २५.०८.२०२५

अर्जदार : १. काळीबाई भ्र. फकीरचंद चव्हाण, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोहाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद २. छायाबाई भ्र. रघुनाथ राठोड, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. गराडातांडा ता. कनड जि. औरंगाबाद ३. निर्दोष पिता फकीरचंद चव्हाण, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. मोहाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. संतोष पिता फकीरचंद चव्हाण, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. मोहाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. सविताबाई भ्र. मित्रमिलन राठोड, वय ३६ तर्षे, धंदा घरकाम, रा. हरसवाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद ६. अनिताबाई भ्र. जयलाल राठोड, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. आंबातांडा ता. कत्रड जि. औरंगाबाद ७. वनिता भ्र. ज्ञानेश्वर जाधव, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. सावंगी ता. चाळीसगांव जि. जळगांव ८. पार्वताबाई भ्र. योगेश राठोड, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. आंबातांडा ता. कन्ड जि. औरंगाबाद

विरुध्द

निरंक

गैरअर्जदार : अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ते ८ यांनी ॲड.टी.डी. शिंदे कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत फकीरचंद पिता रामचंद्र चव्हाण हे अर्जदार नं. २ ते ७ यांचे वडील असुन अर्जदार क्रं. १ काळीबाई ही त्यांची विधवा पत्नी आहे. ते दिनांक ३०.०७.२०२४ रोजी मौजे मोहर्डा ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मयत फकीरचंद पिता रामचंद्र चव्हाण यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारत्त नाही. फकीरचंद पिता रामचंद्र चव्हाण हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय व महसुल दप्तरी इंतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्य मुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. व तशी मागणी अर्जात केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करून अर्जदार नं. १ ते ८. च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक– २८/०७/२०२५

पुढील तारीख २५.०८.२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख: ०४/०९/२०२५ दि.कि. अर्ज क्र. ३७६/२०२५

अर्जदार : १) चंद्रकांत सदाशिव खैरे, वयः ४९ वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २) राजु सदाशिव खैरे, वयः ४७ वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३) मिरा कैलास सोनवणे, वयः ४५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. अंधारी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद. ४) सुनंदा गणेश वाडेकर, वयः ४३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. आर नं. ३०१, सुदामा स्मृती, सागरली, बालाजी मंदीरा मागे, डोंबेवली इस्ट, कल्यान, ठाणे, जि. ठाणे. ५) स्वातीबाई गोरख पाडसवान, वयः ३५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पिंपरखेड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक / निल

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील नामे सदाशिव रघुनाथ खैरे हे दि. २४/०१/२०१४ रोजी व आई नामे राधाबाई सदाशिव खेरे हि देखील दि. ०९/१२/२०२४ रोजी मोजे करंजखेड, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत सदाशिव रघुनाथ खैरे व राधाबाई सदाशिव खैरे यांना अर्जदार क्र. १ ते ५ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २८/०७/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ३०/०८/२०२५ दि.कि. अर्ज क्र. ३५५/२०२५

अर्जदार : १) कांताबाई जनार्धन कदम, वयः ७८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. चिंचखेडा खु., ता. कन्नड, जि. औरंगाबाद, २) ताराबाई विजय इघे, वयः ४४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. मालेगाव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद. ३) मधुमती प्रकाश आघाडे, वयः ४१ वर्षे, धंदाः घरकाम, रा. सोबलगाव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद. ४) सुनिता भाऊसाहेब जाधव, वयः ४० वर्षे, धंदाः घरकाम, रा. शिंदी, ता. चाळीसगाव, जि. जळगांव. ५) रा. मुंडवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. संगीता अरुन बारगळ, वयः ३५ वर्षे, धंदाः घरकाम, ६) यशवंत जनार्धन कदम, वयः ३२ वर्षे, धंदाः शेती, रा. चिंचखेडा खु., ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक / निल

अर्ज – बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील नामे जनार्धन रामराव कदम हे दि. १५/०६/२०२५ रोजी मौजे चिचखेडा खु., ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत जनार्धन रामराव कदम यांना अर्जदार क्र. १ ते ६ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २८/०७/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्री. व्हि. डी. पाटील साहेब) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र– २५२/२०२५ पु. तारीख २०.०८.२०२५

अर्जदार : १. अतीक अहेमद अब्दुल समद सय्यद, वय ४३ वर्षे, धंदा जि. औरंगाबाद ह.मु. ९०८, क्लासिक टॉवर, प्लॉट नंबर ११, २, तलोजा पनवेल, जिल्हा रायगड महाराष्ट्र नोकरी, रा. औराळा, ता. कन्नड सेक्टर नं. १८, तलोजा फेज– २. रुतबा भ्र. समीर दरुवाला, वय ४७ वर्षे, धंदा पॅराडाईस, एन.आय.बी.एम. रोड, बिहाईन्ड सनश्री, घरकाम, रा. रो हाऊस नं १४, ग्राफीकॉन कोंडवा खुर्द, पुणे एन आय बी एम पुणे सिटी, पुणे महाराष्ट्र ३. तस्नीन तबस्सुम सय्यद अब्दुल सय्यद, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा.एच नं.४,–१२–५७/१८९, गल्ली नं. २, जनता किराणा स्टोर जवळ, इंदीरा नगर, न्य बायजीपुरा औरंगाबाद जिल्हा छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद

अर्ज :–वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी डि. के. साळवे कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत सय्यद अब्दुल समद सय्यद मोहियोददीन हे अर्जदार नं. १ व २ यांचे वडील असुन अर्जदार क्रं. ३ ही त्यांची विधवा पत्नी असुन अर्जदार क्रं. १ व २ यांची आई आहे. मयत सय्यद अब्दुल समद सय्यद मोहियोददीन हे आजार पणाने दि.०६.१०.२०२० रोजी औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत सय्यद अब्दुल समद सय्यद मोहियोददीन यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. सय्यद अब्दुल समद सय्यद मोहियोददीन हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ३ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक ३०/७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया मॅडम, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. ३६७/२०२५ पुढील तारीख ०८/०९/२०२५

अर्जदार : १) मुमताज बेगम मोहमद अकबर शेख, वय–५७ वर्षे, धंदा–घरकाम, रा. छमनका बंगला, कन्नड, ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) २) रुबीनाबेगम फिरोज अहमद शेख, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंजारवाडा पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव. ३) निखहत अंजुम जावेद काजी, वय ३४ वर्षे, धंदा– घरकाम, रा. पाथर्डीगाव स्ट्रट, मारोती मंदीर समोर नाशिक, अंबड एम.आय.डी.सी. नाशिक ता. जि. नाशिक, ४) रिजवाना वसीम सय्यद, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. जालना औरंगाबाबाद मेन रोड, बदनापुर ता. बदनापुर जि. जालना.

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये, वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एम. एम. भारुका यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे मोहमद अकबर मोहमद ईस्माईल शेख यांचा दिनांक ३०/०४/२०२५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ ते ४ हेच केवळ वारस असुन अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही. अर्जदार क्र. १ यांचे पती नामे मोहमद अकबर मोहमद ईस्माईल शेख मृत्यु पुर्वी कन्नड ता. कन्नड येथील रहिवाशी असुन मोल मजुरी करुन अर्जदार क्र. १ ते ४ यांचा उदरनिर्वाह करीत होते. अर्जदारास वरील प्रमाणे मयत मोहमद अकबर मोहमद ईस्माईल यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकीय व निमशासकिय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाणपत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचन निर्माण झालेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक ०१/०७/२०२५ रोजी कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन. दिनांक २८/०७/२०२५

आदेशावरून

क. लिपिक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि.अर्ज नं. ३६८/२०२५

अर्जदार : १. जिजाबाई भ्र. रामराव बनसोडे, वय ७५ वर्ष, धंदा शेती व घरकाम, रा. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. राजु पि. रामराव बनसोडे, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. वंदना भ्र. संतोष मोरे, वय ३७ वर्ष, धंदा घरकाम, रा. सुवर्ण पालेश्वर कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. विजय पि. रामराव बनसोडे, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार नं. १ ते ४ हे मयत रामराव गणपत बनसोडे, यांचे कायदेकशीर वारस आहे असे वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. संजय एस. बोरसे, कन्नड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील हे मयत रामराव गणपत बनसोडे हे होते व ते मौ. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होते. ते अल्पश्या आजाराने दि. २५/४/२०२५ मध्ये मयत झालेले आहेत. त्यांना कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ४ हे होते व आहेत. सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच त्याबाबत त्यांचे मृत्यु प्रमाण पत्र सोबत दाखल केले आहे.

तसेच सदर वारसप्रमाण पत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व अन्य कामा करीता वारस प्रमाण पत्र हे अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे देण्यात यावे. अर्जदार नं. १ ते ४ हे एकाच कुंटुंबातील असल्यामुळे त्याचे आपसात सलोख्याचे, प्रेमाचे, चांगले संबंध आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे सदर वारस प्रमाण पत्र मिळण्याबाबत अर्जदार नं. १ ते ४ यांची स्वइच्छेप्रमाणे संमत्ती आहे. ज्या कोणाचा उजर आक्षेप असेल तर त्याने आपला उजर व आक्षेप सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्दीपासुन ३० दिवसाच्या आत मुळ कागदपत्रांसह लेखीस्वरुपात या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणताही उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार नं. १ ते ४ हे मयत रामराव गणपत बनसोडे यांचे कायदेकशीर वारस आहे यांचे कायदेशीर वारस आहेत. या बाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला उजर व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

आज दि.२२/७/२०२५ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## जाहिर नोटीस

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २३७/२०२५

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात...**

१. श्रीमती. संगीताबाई सुनिल पाटील वय–५३ वर्षे, धंदा–गृहिणी, २. श्री. वैभव सुनिल खैरनार (पाटील) वय–२७ वर्षे, धंदा–शेती, ३. भाग्यश्री दिपक सुर्यवंशी वय–३१ वर्षे, धंदा–गृहिणी, सर्व रा. छत्रपती शिवाजी चौक, मु.पो. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर– ४३११५०

–: विरुध्द :–

सामनेवाले– कोणीही नाही

ज्याअर्थी सुनिल सुखदेव पाटील यांचे दि. ०५/०६/२०२५ रोजी बनोटी येथे निधन झालेले आहे त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे ॲड. श्री. तन्मय सुनिल जैन यांच्यामार्फत अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा सुनिल सुखदेव पाटील यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि.४/९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता. ३/७/२०२५

लिपिक अधिक्षक

सि.ज.ज्यु.डि.सा., सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर. एस. तापडीया मॅडम, दुसरे सह–दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ३७९/२०२५पुढील तारीख २/०९/२०२५

अर्जदार : १–मंगलबाई भ्र. दिलीपराव भोसले, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. घर नं. १३९, दौलत निवास, सरस्वती कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २–शोभा भ्र. प्रकाश चव्हाण, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. रांजणगांव, ता. चाळीसगांव, जिल्हा जळगांव. ३–रेखा भ्र. भगवंतराव निकम, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. गुरुकुल वसाहत, ताहराबाद रोड, श्री. शिवाजीनगर, राहुरी, ता. राहुरी, जिल्हा अहील्यानगर,४–ललीता भ्र. यशवंतराव निंबाळकर, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. हिल व्हयु प्लाझा, फलॅट नंबर २०३, पुणे सातारा रोड, पवार हॉस्पीटल जवळ, बजाज नगर, पुणे, ता. व जि. पुणे. ५–आशा भ्र. विलास राजे भोसले, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा.वावी, ता. सिन्नर, जिल्हा नाशिक ६–वैशाली भ्र. दिलीप राजे भोसले, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वावी, ता. सिन्नर, जिल्हा नाशिक

विरूद्ध

निल

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. व्ही. के. मोहिते, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ६ यांचे वडील नामे माणिकराव माधवराव शिंदे हे दिनांक १९.०६.२०११ रोजी मौजे कन्नड, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रमांक १ ते ६ यांची आई नामे सुलोचनाबाई भ्र. माणिकराव शिंदे या वृध्दापकाळाने दिनांक १.१०.२०२४ रोजी मौजे कत्रड, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहेत. सोबत मयतांचे नगर पालिका कार्यालय कन्नड, ता. कन्नड, यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी अर्जदारांनी या विदयमान न्यायालयाच्या अवलोकनासाठी वंशावळ दिली आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र ह शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी तसेच नगर पालिका कार्यालयात नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हे मागणी करीत आहे. सबब अर्जास कारण २०.०७.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे..

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी इंतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २५/०७/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांकः २८/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. व्ही. एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २७३/२०२५ पुढील तारीखः १८/८/२५

अर्जदार : महेश पिता शिवाजी निकम, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. टाकळी अंतुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

– विरुध्द–

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद / छत्रपती संभाजीनगर

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. जे.सी.मगर, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, शिवाजी पुंडलिक निकम व छाया भ्र. शिवाजी निकम रा.टाकळी अंतुर ता. कन्नड येथील रहिवाशी असून आपसात पती पत्नी होते. शिवाजी पुंडलिक हे दिनांक २७.४.२००७ रोजी मौजे टाकळी अंतुर ता. कन्नड येथे मयत झाले. तसेच त्यांची पत्नी छाया शिवाजी निकम या दिनांक २९.७.२०१२ रोजी त्यांचे माहेरी मौजे लोहगांव ता. कन्नड येथे मयत झाल्या आहे, मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना विवाह संबंधातून एक मुलगा महेश शिवाजी निकम हा झालेला आहे, मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना अर्जदारा व्यतीरिक्त कोणीही वारस नाही. मुळ अर्जा सोबत ग्राम पंचायत टाकळी अंतुर व लोहगांव यांनी दिलेले मृत्यु प्रमाण पत्र अर्जदारांनी अर्जा सोबत दिलेले आहे. मयत शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांना अर्जदार हा एकमेव कायदेशीर वारस आहे. मथत शिवाजी पुंडलिक निकम हे एम.एस.ई.बी.सब स्टेशन चिंचोली येथे विज सेवक म्हणून कार्यरत होते. शिवाजी पुंडलिक निकम व छाया शिवाजी निकम यांचे पश्चात अर्जदार यास अनुकंपातत्वावर त्याचे वडीलांचे जागेवर नौकरी मिळण्यासाठी व ईतर शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक ०६.०५.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ३०.०५.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक ३०.०५.२०२५

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया मॅडम सहदिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र.३८३/२०२५ पुढील तारीख ०४/०९/२०२५

अर्जदार : १) मनिषा भ्र. अप्पा बलक वय– २९ वर्षे, धंदा– घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद २) कार्तिक पि. अप्पा बलक वय– १३ वर्षे, धंदा शिक्षण, रा. नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद (अ.पा.क्र.अ. क्र. १) ३) अनुसया भ्र. पांडुरंग बलक वय ७६ वर्षे, धंदा– घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ आर.एम नरोटे यांच्या मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार ही वरील ठिकाणची कायमची रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ची आई आहे. अर्जदार क्र. २ हा अज्ञान असुन त्याची अ.पा.क अर्जदार क्र. १ ही जन्मदाती आई आहे, तसेच अर्जदार क्र. ३ ही अर्जदार क्र. १ ची सासु व अर्जदार क्र. २ ची आजी आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ चे वडील व अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा नामे अप्पा पांडुरंग बलक हे होते ते दिनांक २५/१२/२०१४ रोजी शासकिय रुग्णालय औरंगाबाद येथे अल्पशा आजाराने मयत झालेले आहे व त्यांचा अंत्यविधी मौजे नागापुर येथे करण्यात आलेला आहे. अर्जदार क्र. १ चे सासरे, अर्जदार क्र. २ याचे आजोबा व अर्जदार क्र. ३ चे पती नामे पांडुरंग बलक हे पुर्वीच मयत झालेले आहे. मयत अप्पा पांडुरंग बलक यांचे मृत्यु पश्चात अर्जदार क्र. १ ते ३ हे त्यांचे कायदेशीर वारस आहे, सोबत महानगर पालीका औरंगाबाद यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जदार यांना मयत अप्पा पांडुरंग बलक यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल, ग्रामपंचात कार्यालयात मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी तसेच शासकिय, व निमशासकिय योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यासाठी अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे दिनांक २०/०७/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे कायदेशीर वारस असुन अर्जदार क्र. १ ते ३ शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक ३०/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.वि.दी पाटील साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज.क्रं. ३८८/२०२५ पुढील तारीख १०/९/२०२५.

अर्जदार :– १. मुन्सी बुढण शेख, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. गुलशेर बुढण शेख वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. शेख मुक्तार शेख बुढण, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. ताहेर बुढण शेख, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. शेख अमजद शेख पाशु वय ४७ वर्षे, धंदा मजुरी, रा. गल्ली क्र. २७ इंदिरा नगर औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. ६. शेख फेरोज शेख पाशु वय ४३ वर्षे, धंदा मजुरी, रा. गल्ली क्र.२३ इंदिरा नगर औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. ७. अफरोज पाशु शेख वय ४१ वर्षे, धंदा – मजुरी, रा. गल्ली क्र.२६ इंदिरा नगर औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. ८. अफझल पाशु शेख वय ३७ वर्षे, धंदा मजुरी, रा. गल्ली क्र.२६ इंदिरा नगर औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. ९. कादर पाशु शेख वय ३६ वर्षे, धंदा मजुरी, रा. गल्ली क्र.२६ इंदिरा नगर औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. १०. अजहर पाशु शेख, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी, रा. गल्ली क्र. १० करीम नगर कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ११. रुबीना बेगम साजेद खान पठाण, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. मुल्ला गल्ली जामा मसजिद जवळ सिल्लोड ता. सिल्लोड जि. औरंगाबाद १२. रुक्साना बेगम अजीम शेख, वय ३२ वर्षे, धंदा – घरकाम, रा. दिगर पो. पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. १३. समीना बेगम आरेफ खान, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. जसवंतपुरा रहेमानिया कॉलनी औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. १४. फरजानबी युनुसखा पठाण, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. कोळसवाडी मु ब्राम्हणी गराडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. १५. शेख नईन शेख नवाब, वय ३४ वर्षे, धंदा–शेती, रा. आखतवाडा पो. पळसवाडी ता. खुलताबाद जि. औरंगाबाद. १६. शेख रिहान शेख नवाब, वय २४ वर्षे, धंदा मजुरी, रा. आखतवाडा पो. पळसवाडी ता. खुलताबाद जि. औरंगाबाद. १७. फेरोज जब्बार पठाण, वय ४४ वर्षे, धंदा मजुरी, रा. कनकावती नगर रेलनावडी ता. कन्नड जि. औरंगाबाद. १८. अशरफखा जब्बारखा पठाण, वय ४१ वर्षे, धंदा मजुरी रा. कनकावती नगर रेलनावडी ता. कन्नड जि. औरंगाबाद. १९. हमीद जब्बार पठाण, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी, रा. कनकावती नगर रेलनावडी ता. कन्नड जि. औरंगाबाद. २०. शेख आशियाबी शेख आरिफ वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा.तिडका ता. सोयगाव जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :– कोणी

अर्ज :– बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. शेख कामरान रफिक यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत बुढन बाबन शेख व तसलीमबी शेख बुढन यांचे मुले असून अर्जदार क्र. १२ ते १४ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. तसेच मयत बुढन बाबन शेख व तसलीमबी शेख बुढन यांचा मयत मुलगा शेख पाशु शेख बुढन हा दि.२६/०२/२०१८ रोजी व त्यांची पत्नी मयत नामे रजिया बेगम पाशु शेख हि दि. २८/०४/२०१८ रोजी मौजे गल्ली क्र.२६ इंदिरा नगर औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद येथे मरण पावले आहे. जे अर्जदार क्रं. ५ ते ११ यांचे आई वडील आहेत. तसेच मयत बुढन बाबन शेख व तसलीमबी शेख बुढन यांची मयत मुलगी नामे हसिनाबी शेख नवाब हि दि.०८/०३/२०१५ रोजी मौजे आखतवाडा पो. पळसवाडी ता. खुलताबाद जि. औरंगाबाद येथे मरण पावली आहे. जे अर्जदार क्र. १५ व १६ यांची आई आहेत. तसेच मयत बुढन बाबन शेख व तसलीमबी शेख बुढन यांची मयत मुलगी नामे रेहानाबी जब्बार खान हि दि.१६/०५/२०२३ रोजी मौजे कनकावती नगर रेलनावडी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे मरण पावली आहे. जे अर्जदार क्र. १७ ते २० यांची आई आहेत. अर्जदार क्रं. १ ते २० हे आपसात सख्खे भाऊ बहिण व नातेवाईक आहे. अर्जदार क्रं. १ ते २० हे मयत बुढन बाबन शेख व तसलीमबी शेख बुढन यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्रं.१ ते ४ व १२ ते १४ यांचे वडील नामे बुढन बाबन शेख हे दि.१०/१२/२००१ रोजी व अर्जदार क्रं. १ ते ४ व १२ ते १४ यांची आई नामे मयत तसलीमबी बुढन शेख हि दि.२८/०५/२०१८ रोजी मौजे पळशी बु ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते २० यांना मयत बुढन बाबन शेख व तसलीमबी शेख बुढन यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते २० हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते २० हे व मयत नामे बुढन बाबन शेख व तसलीमबी शेख बुढन हे मौजे पळशी बु ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते पळशी बु ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते २० हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०९/१०/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



**खुलताबाद साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, ज्ञानेश्वर बारगळ, नवनाथ बारगळ शहराध्यक्ष परसराम बारगळ, छबू कांबळे भाऊसाहेब तांबारे ,,काशिनाथ तुपे, शंकर अंभोरे,तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते**

# कर्तव्य बजावतांना समाजसेवाही करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर,दि.१(जिमाका)- महसूल विभागाचा संपर्क हा समाजातील सर्व घटकांशी येतोच. जीवनाचा असा एकही भाग नाही की जो महसूल विभागाशी संबंधित नसतो. त्यामुळे महसूल विभागाचे कर्मचारी म्हणून आपण सर्व समाजघटकांशी विनम्रतेने वागले पाहिजे. महसूल कर्मचाऱ्यांनी नोकरीचे कर्तव्य बजावत असतांना सामाजिक उपक्रमात सहभाग घेऊन समाजसेवाही करा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.



छत्रपती संभाजीनगर उपविभागामार्फत महसूल दिन कार्यक्रमाचे आयोजन आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करण्यात आले.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसिलदार कैलास वाघमारे, अपर तहसिलदार डॉ. परेश चौधरी आदी उपस्थित होते.

उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांना यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. नायब तहसिलदार सतीश भदाणे, मंडळ अधिकारी कल्याण वानखरे, सहा. महसूल अधिकारी श्रीधर दांडगे, ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल शेळके, महसूल सहायक श्रीमती शोभा टाक, वाहन चालक एम.एम. शेख, शिपाई समीर शेख, महसूल सेवक अण्णा जाधव या कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. सर्व कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कार्य करुन जनतेस सेवा द्यावी. आपले कर्तव्य हे जनतेला सेवा देणे हे असून ही सेवा विनम्रतेने दिली जावी. अद्यावत तंत्रज्ञानाचा अंगिकार करुन सेवेचा दर्जा उंचवावा,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनीही कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. प्रास्ताविक डॉ. व्यंकट राठोड यांनी केले. रघुनाथ शेळके यांनी आभार मानले.

## प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिवपदी रवींद्र पा. काळे



पैठण दि ०१ :- तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे नेते, शिवाजी बँक व शिवाजी शुगरचे चेअरमन रवींद्र काळे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव पदी पक्षाने निवड केलेली असून, या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.काँग्रेस पक्षाचे निष्ठावान नेते माजी आमदार शिवाजीराव काळे यांचे सुपुत्र, गेल्या पंधरा वर्षांपासून तालुकाध्यक्ष, जि. प. सदस्य, मार्केट कमिटी संचालक, शिवाजी बँकेचे व शिवाजी शुगर नांदरचे चेअरमन अशी सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात त्यांची ओळख आहे.या निवडीबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार कल्याणराव काळे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चौहान, अमितभैय्या देशमुख, भाऊसाहेब पा. औटे, हरिपंडित गोसावी, राजू टेकाळे, हसनोद्दीन कट्यारे, फाजल टेकडी, राजू निवारे,पाशा मंजन, अप्पासाहेब गायकवाड, भाऊसाहेब पिसे, पवन लोहिया, जितू पांडे,नरसिंग लोहिया, उमेश पंडुरे, यशवंत काळे, दत्ता फासाटे, किशोर वैद्य, उत्तमराव जाधव, शेरखा पठाण, ज्ञानेश्वर पानखडे, अप्पा मिसाळ, जगदीश वैद्य, ई. आय पठाण, जी. व्ही. म्हस्के,, संतोष राऊत, आशिष पवार, फेरोज शेख आदिनी त्यांचे अभिनंदन केले.

## शॉप्सीला ४५० दशलक्षहून अधिक डाऊनलोड्सह ४ वर्ष पूर्ण

छत्रपती संभाजीनगर : फ्लिपकार्टचा शॉप्सी हा भारतातील झपाट्याने विकसित होत असलेला हायपरव्हॅल्यू प्लॅटफॉर्म भारतीयांना राजा/राणीप्रमाणे जीवन जगण्यास सक्षम करण्यासाठी आपल्या मिशनला अधिक दृढ करत चौथा वर्धापन दिन साजरा करत आहे, जेथे मूल्याप्रती जागरूक खरेदीदारांना अद्वितीय मूल्य देत आहे. या प्लॅटफॉर्मने ४५० दशलक्ष ॲप डाऊनलोड्सचा टप्पा पार केला आहे आणि आता १९,००० हून अधिक पिन कोड्सपर्यंत डिलिव्हरी देतो, यासह ते देशातील मेट्रो शहरांपासून चतुर्थ श्रेणीच्या शहरांपर्यंत चारही प्रदेशांमध्ये पोहोचले आहेत.यावर्षी शॉप्सीने ११.५ दशलक्ष नवीन खरेदीदारांना ऑनबोर्ड केले आहे, ज्यापैकी अनेकांनी पहिल्यांदाच ई-कॉमर्सचा अनुभव घेतला. प्लॅटफॉर्मने आपली उपस्थिती वाढवण्यासह भागलपूर, मेदिनीपूर, दुंडा व राजनगर अशी चतुर्थ श्रेणीची शहरे आणि दुर्गम जिल्ह्यांमध्ये मागणीत मोठी वाढ केली. यामधून शॉप्सीच्या मूल्य-केंद्रित किमती, सुलभ वापर आणि ३०० रूपयांपेक्षा कमी किंमतीमधील क्यूरेटेड श्रेणीप्रती वाढता विश्वास दिसून येतो.

## भारतातील सर्वात बारीक क्वाड-कर्व्ह डिस्प्लेसह वीवो टी४आर ५जी लाँच

पुणे - जागतिक स्मार्टफोन ब्रँड, विवोने आज विवो टी४आर ५जी लाँच केले, जो विवो टी सीरीज पोर्टफोलिओमध्ये एक नवीन भर आहे. हा स्मार्टफोन सर्वात पातळ क्वाड वक्र डिस्प्ले स्मार्टफोन१ आहे जो उद्योगातील आघाडीच्या पाणी आणि धूळ संरक्षणासह येतो - आईपी ६८ आणि आईपी६९ रेटिंगसह. हा स्मार्टफोन तरुणांच्या आणि साहसी प्रेमींच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन केला आहे, जो प्रत्येक परिस्थितीत तडजोड न करता एक उत्तम अनुभव देतो. वीवो टी४आर ५जी मध्ये मीडियाटेक डाइमेंशन ७४०० एसओसी आहे, जे त्याला शक्तिशाली कामगिरी प्रदान करण्यास सक्षम करते. यात ५० मेगापिक्सेल सोनी आयएमएक्स८८२ मुख्य कॅमेरा आणि ३२ मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा आहे, जे दोन्ही ४ के व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यास सक्षम आहेत, ज्यामुळे उच्च-गुणवत्तेचे व्हिडिओ कॅप्चर करणे शक्य होते. या फोनमध्ये ५,७०० एमएएचची मोठी बॅटरी आहे जी ४४ वॅट जलद चार्जिंगला सपोर्ट करते, ज्यामुळे दीर्घकाळ वापरता येतो.

## आईकू ने खास ऑफर्स सादर केल्या

नवी दिल्ली : हाय-परफॉर्मन्स स्मार्टफोन ब्रँड आईकू ने अमेज़न ग्रेट फ्रीडम फेस्टिव्हल सेल २०२५ दरम्यान त्यांच्या लोकप्रिय स्मार्टफोन्सवर आकर्षक ऑफर्सची घोषणा केली आहे. यामध्ये आईकू ज़ेड१० लाइट, आईकू ज़ेड१०एक्स, आईकू ज़ेड१०, आईकू नियो १०आर, आईकू नियो १० आणि आईकू १३ सारखे मॉडेल्स समाविष्ट आहेत. अमेज़न.इन वर उद्या दुपारी १२ वाजल्यापासून सेल लाईव्ह झाला आहे, तर प्राइम सदस्यांना आज मध्यरात्रीपासून लवकर प्रवेश मिळेल. तंत्रज्ञान प्रेमींसाठी, आईकू स्मार्टफोन नेहमीच शक्तिशाली कामगिरी आणि पुढच्या पिढीचा अनुभव देतात.

## कलाकारांनी जिममध्ये फिटनेस राखण्याच्या त्यांच्या पद्धतींबाबत सांगितले!

अनेकजण फिटनेससाठी जिममध्ये व्यायाम करायला जातात, जो शारीरिक फायदे देण्यासोबत तणाव दूर करण्याचा आणि मन प्रसन्न करण्याचा उत्तम मार्ग देखील आहे. वजन उचलायचे असो, ट्रेडमिलवर धावणे असो किंवा सर्किट प्रशिक्षण घ्यायचे असो जिम अनेक कलाकारांसाठी उत्साहित होण्याची वैयक्तिक जागा बनली आहे. एण्ड टीव्ही कलाकार पारस अरोरा (जीतू, 'घरवाली पेडवाली'), सोनल पनवार (मलायका, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है') जिममध्ये नियमितपणे व्यायाम केल्याने शारीरिकदृष्ट्या तंदुरूस्त आणि मन प्रसन्न ठेवण्यास कशाप्रकारे मदत होते, याबाबत सांगत आहेत. आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये जीतूची भूमिका साकारताना पाहायला मिळणारा पारस अरोरा म्हणाला, ''माझ्यासाठी जिम म्हणजे थेरपी आहे.

## कलाकारांनी त्यांच्या मूळगावामधील आवडणाऱ्या पावसाळी स्वादिष्ट खाद्यपदार्थांबाबत सांगितले!

पावसाळ्यामध्ये वेगळीच जादू अनुभवायला मिळते. रिमझिम पडणाऱ्या पावसाच्या सरींचा आवाज, मातीचा सुगंध, आणि गरमागरम चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याची आवड निर्माण करणारे वातावरण. अनेक कलाकारांसाठी पाऊस फक्त ऋतू नसूनआठवणी, गाथांना उजाळा देतो, तसेच बालपणीच्या रुचकर चवींची आठवण करून देतो. एण्ड टीव्हीवरील कलाकार पारस अरोरा (जीतू, 'घरवाली पेडवाली'), योगेश त्रिपाठी (दरोगा हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन')आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') त्यांच्या मूळगावातील खास पावसाळी स्वादिष्टखाद्यपदार्थांबाबत सांगत आहेत, जे आजही त्यांच्या जीवनात आनंदाची सर घेऊन येतात.मालिका 'घरवाली पेडवाली'मधील पारस अरोरा ऊर्फ जीतू म्हणाले, पावसाळ्यामध्ये स्वादिष्ट व कुरकुरीत खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतल्याशिवाय राहू शकत नाही. उत्तरप्रदेशचा असल्यामुळे माझ्या मनात येणारी पहिली गोष्टी म्हणजे चाट, मसालेदार, तिखट व मन तृप्त करणारे खाद्यपदार्थ. मुंबईमध्ये वडा-पाव खूप लोकप्रिय आहे, पण बरेलीमध्ये आमचे स्थानिक खाद्यपदार्थ आहेत, ज्यांचा पावसाळ्यामध्ये मनसोक्त आस्वाद घेतला जातो.

## कोणी बनले मीडिया स्टार, तर कोणी आहे एआयच्या प्रेमात!

या आठवड्यात एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है' पाहण्यासह हसून-हसून लोटपोट होण्यास सज्ज राहा, जेथे आधुनिक तंत्रज्ञान गोंधळामध्ये विलक्षण वळण आणते. एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत कटोरी अम्मा ऊर्फ हिमानी शिवपुरी म्हणाल्या, ''हप्पू सिंग (योगेश त्रिपाठी) त्याच्या आजुबाजूला असलेले सर्वजण सोशल मीडियाद्वारे पैसे कमवत आहेत हे पाहिल्यानंतर सेलिब्रिटी होण्याचे स्वप्न पाहतो, अगदी त्याचा कमी हुशार मित्र चिरको देखील ऑनलाइन सेन्सेशन बनला आहे.

## नित्यक्रम सोपे करण्यासाठी एआयचा वापर

आर्टिफिशियल इंटलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) आता फक्त तंत्रज्ञान व इनोव्हेशन विश्वापुरते मर्यादित राहिलेले नसून आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग बनत आहे. आज टेलिव्हिजन कलाकारांना व्यस्त वेळापत्रक, सोशल मीडियावरील मागण्या आणि वैयक्तिक जबाबदाऱ्या यांचा सामना करावा लागाते. त्यांच्यासाठी एआय शांत, पण प्रभावी आधारस्तंभ ठरले आहे. एण्ड टीव्हीवरील कलाकार सांगतात की ते दैनंदिन कामांचे नियोजन, स्टाइलसंदर्भातील संकल्पनांचा शोध घेणे, आरोग्याचे व्यवस्थापन करणे आणि त्यांच्या डिजिटल प्लॅटफॉर्म्ससाठी कन्टेन्ट तयार करणे यासाठी काही प्रमाणात, पण प्रभावी पद्धतीने एआयचा वापर करत आहेत.

## सोयगाव तहसील कार्यालयात महसूल सप्ताहाचा प्रारंभ;-सात दिवस विविध उपक्रम

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ ऑगस्ट

सोयगाव तहसील कार्यालयात गुरुवारी सायंकाळी चार वाजता महसूल सप्ताहाचा प्रारंभ नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला दरम्यान शुक्रवार (दि.१) पासून ते (दि.७) पर्यंत सात दिवस विविध उपक्रम राबविणार असल्याचे नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांनी सप्ताहाचा प्रारंभी सांगितले.

महसूल सप्ताह निमित्ताने सोयगाव तहसील कार्यालयात पाच हजार वृक्षलागवड करण्यात येणार असून शुक्रवारी (दि.१) महसूल दिन साजरा करण्यात येईल,( दि.२)शासकीय जागेवर सन.२०११ पूर्वी अतिक्रमण केलेल्या कुटुंबा पैकी अतिक्रमण नियमनुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना जागांचे पट्टे वाटप करने,(३ आगस्ट) पानंद रस्त्याची मोजणी करून दुतर्फा वृक्षारोपण करणे,(दि.४) मंडळ निहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजसव अभियान, (दि.५) विशेष सहाय्य योजनेतील डी बी टी न झालेल्या लाभार्थ्यांच्या घर भेटी,(दि.६) शासकीय जमीनीवरील अतिक्रमणे निष्कसित करणे,व (दि.७) महसूल अभियानाचा सांगता करण्यात येणार असल्याचे संभाजी देशमुख यांनी सांगितले यावेळी नायब तहसीलदार चरण सिंग बहुरे,राहुल पत्रिके,काकासाहेब सावळे, गोपीनाथ जैवळ, ज्ञानेश्वर सोनवणे, विजय उमाळकर,उज्जला वामने,संजय ताले,पूनम क्षीरसागर, सुशील कांबळे,केतन शिंदे,संभाजी बोरसे,संजय नावकर,योगेश चौधरी, आदींसह कर्मचारी उपस्थित होते...

## भिलदरी तांडा पाझर तलाव प्रकरणात शेतकऱ्यांचा आक्रोश

### बंजारा ब्रिगेडचे ऋषिकेश चव्हाण व धारासिंग राठोड यांचा इशारा - ५ ऑगस्टला जलसमाधी आंदोलन

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०१ ऑगस्ट - भिलदरी तांडा येथील पाझर तलावाच्या बॅकवॉटरवर शासनाने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी दीड कोटीहून अधिक निधी मंजूर करून केटीकम पूल बांधण्यासाठी दिला होता. मात्र ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने व मनमानी कारभारामुळे हे काम चुकीच्या पद्धतीने पार पडले असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

या गैरव्यवहारामुळे अनेक शेतकऱ्यांना शेतात पेरणी करणे शक्य झाले नाही. तर ज्यांनी पेरणी केली आहे, त्यांना शेतात खत घेऊन जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. या संदर्भात शेतकऱ्यांनी वारंवार तोंडी तसेच दूरध्वनीद्वारे अधिकाऱ्यांना विनंती केली, मात्र याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी बंजारा ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ऋषिकेश चव्हाण आणि जिल्हाध्यक्ष धारासिंग राठोड यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्यांना निवेदन देऊन इशारा दिला आहे की, येत्या दोन दिवसांत शेतकऱ्यांसाठी पर्यायी रस्त्याचे काम तातडीने सुरू न झाल्यास दिनांक ५ ऑगस्ट रोजी त्रस्त शेतकऱ्यांना घेऊन जलसमाधी आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनामुळे प्रशासनाची झोप उडणार असून, शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार चव्हाण व राठोड यांनी व्यक्त केला आहे.

## इमाव विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह प्रवेश वेळापत्रक

छत्रपती संभाजीनगर,दि.१ - इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रबाई फुले आधार योजनेसाठी https://hmas.mahait.org शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज मागविण्याबाबत वेळापत्रक निश्चित झाले आहेत.

बी.ए., बी.कॉम, बी.एस.सी, अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम ए एम एस सी असे पदवी नंतरचे पदव्यूत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून)- अर्ज करावयाचा कालावधी दि.१ ते १७ ऑगस्ट, अर्ज छाननी - दि.१८ ते २१ ऑगस्ट, पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम व प्रसिद्ध करणे दि.२२ ऑगस्ट, पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत दि.४ सप्टेंबर, रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड यादी प्रसिद्ध करणे दि.५ सप्टेंबर, दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची अंतिम मुदत दि.१५सप्टेंबर पर्यंत राहील.

## अहिल्यानगर आर्किटेक्टस् इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो.ची नूतन कार्यकरिणी जाहीर

अहिल्यानगर : आर्किटेक्टस् इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स अहिल्यानगर यांची नूतन कार्यकारिणी जाहीर अध्यक्ष पदी इंजि. अभिजित देवी , उपाध्यक्ष पदी इंजि. प्रदीप तांदळे तर सचिवपदी इंजि. भूषण पांडव खजिनदार इंजि. सुनिल औटी तर सह सचिव पदी इंजि. संतोष खांडेकर यांची निवड करण्यात आली. संचालक मंडळ निवडणुक प्रक्रिया नुकतीच पार पडली संचालक पदी आदिनाथ दहिफळे, संजय चांडवले, सुनिल जाधव, सचिन डागा, जितेश सचदेव, संकेत पादिर, अनमोल जैन आणि गौरव मांडगे यांची निवड करण्यात आली. २०२५-२६ सालासाठी झालेल्या कार्यकारिणी निवडणुकीत अध्यक्षपदी अभिजित देवी यांची बहुमताने निवड करण्यात आले तर उपाध्यक्षपदी प्रदिप तांदळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून अजित माने यांनी काम पाहिले त्यांना विशारद पेटकर, मधुकर बालटे, नंदकिशोर घोडके, राजेंद्र पाचे, वैभव देशमुख, रवींद्र सोनावणे, चंद्रकांत तागड, मनोज जाधव, कैलास ढोरे यांनी सहकार्य केले.



यावेळी बोलताना अध्यक्ष अभिजित देवी यांनी वर्षभरात एसा भवनच्या कामास आणि सभासदांच्या शासकीय विभागात येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या कामास प्राध्यान्य देणार असल्याचे नमूद केले. त्याचबरोबर वर्षभर विविध तांत्रिक सेमिनार , प्लांट आणि साइट व्हिजिटचे आयोजन करणार असून बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड स्पर्धेचे मोठ्या स्वरूपात आयोजन करणार असल्याचे सांगितले.

मावळते अध्यक्ष इंजि. आदिनाथ दहिफळे यांनी मागील वर्षभरात केलेल्या बॉक्स क्रिकेट स्पर्धा, घटना दुरुस्ती बाबत कार्यवाही आणि मागील वर्षात आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचा आढावा घेतला तसेच सभासद हितास प्राधान्य देऊन विविध उपक्रमांचे आयोजन केल्याचे सांगितले.

वार्षिक सर्वसाधारण सभेस इक्बाल सय्यद, मकरंद देशपांडे, अनिल मुरकुटे,अन्वर शेख, रत्नाकर कुलकर्णी, अमेय कुलकर्णी, अजय दगडे, सलीम शेख, सुनिल हळगावकर, रमेश कार्ले, सुरेश परदेशी, अशोक मवाळ, एस यू खान, मिनल काळे, सुरेंद्र धर्माधिकारी,दीपक मुथा, शैलेश सप्रे, साजिद शेख, रमेश बोरुडे, अमोल येनगंदुल, प्रथमेश सोनावणे आणि सभासद उपस्थित होते.

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कृषि महाविद्यालय आणि डी. वाय. पाटील कृषि व तंत्रज्ञान विद्यापीठ, तळसंदे (कोल्हापूर) यांच्यात सामंजस्य करार

अ.नगर : आधुनिक ऊस रोपे उत्पादन व कृषि संशोधन केंद्र स्थापनेसाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कृषि महाविद्यालय, अहिल्यानगर आणि डी. वाय. पाटील कृषि व तंत्रज्ञान विद्यापीठ, तळसंदे (कोल्हापूर) यांच्यात बुधवार, ३० जुलै २०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला.



या कराराअंतर्गत दोन्ही संस्था एकत्रितपणे संशोधन, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि शिबिरे आयोजित करून आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञान तसेच उच्च प्रतीची गुणवत्तापूर्ण रोपे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देतील.

करारावर डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) के. प्रथापन आणि विखे पाटील फाउंडेशनचे संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. जे. ए. खोत, सहयोगी अधिष्ठाता डॉ. मंगल पाटील, अहिल्यानगर कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमेश्वर राऊत, प्रा. डॉ. हरीभाऊ शिरसाठ व प्रा. डॉ. सूरज खेडकर उपस्थित होते.

या उपक्रमामुळे ऊस उत्पादनात वाढ, रोपांची स्वयंपूर्णता आणि शाश्वत ऊस शेतीस चालना मिळेल, असा विश्वास दोन्ही संस्थांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केला.

या सामंजस्य करारासाठी संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

हे संशोधन केंद्र ऊस उत्पादक शेतकरी, कृषी क्षेत्रातील विद्यार्थी व संशोधक, तसेच साखर कारखान्यांसाठी मोलाचे मार्गदर्शन केंद्र ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्री.व्हि. डी. पाटील साहेब,) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- २५२/२०२४

पु. तारीख २६.०८.२०२५

अर्जदार : १. मिना बाळासाहेब पगारे, वय ५३ वर्षे, धंदा नोकरी, रा. औराळा ता. कन्नड जि. औरंगाबाद २. शिल्पा बाळासाहेब पगारे, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. औराळा ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. तेजस बाळासाहेब पगारे, वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा. औराळा ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. झेलाबाई छगन पगारे, वय-८६ वर्षे, धंदा जि. औरंगाबाद घरकाम, रा. मु.पो. औराळा ता. कन्नड

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी डि. के. साळवे कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की, मयत बाळासाहेब छगन पगारे हे अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील असुन अर्जदार क्रं. ४ ही त्यांची सासु असुन अर्जदार नं. १ विधवा पत्नी असुन अर्जदार क्रं. २ व ३ यांची आई आहे. मयत बाळासाहेब छगन पगारे हे आजार पणाने दि.०१.०५.२०२४ रोजी नाशिक येथे तात्पुरत्या घरी मयत झालेले आहे. मयत बाळासाहेब छगन पगारे यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. बाळासाहेब छगन पगारे हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, महसुल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ४ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक ३०/७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्रीमती तापडिया एस. आर मॅडम ) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- ३६१/२०२५ — पु. ता : ०८.०९.२०२५

अर्जदार : १. मोवजी पिता हेमा सावंत, वय ७२ वर्षे, धंदा शेती, रा. सावंतवाडी, दस्तापुर ता. सोयगांव जि. औरंगाबाद २. शंकर पिता हेमा सावंत, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. सावंतवाडी, दस्तापुर ता. सोयगांव जि. औरंगाबाद ३. नामेदव पिता हेमा सावंत, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. सोनवाडी, कोंडबारी ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी डि. के. साळवे कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की, मयत हेमा पिता राघु सावंत हे अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडील आहे मयत हेमा पिता राघु सावंत हे आजार पणाने दि.१०.११.२०२३ रोजी मौजे सोनवाडी येथे मयत झालेले आहे. मयत हेमा पिता राघु सावंत यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. हेमा पिता राघु सावंत हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ३ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक ३०/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा.अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्री.व्हि. डी. पाटील साहेब,) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- ३३१/२०२५ — पु. तारीख १३.०८.२०२५

अर्जदार : १. साल्हे मोहसिन बावजीर, वय ४१ वर्षे, धंदा व्यापार, रा. सरस्वती कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद २. अब्दुल्ला मोहसिन बावजीर, वय ५१ वर्षे, धंदा- व्यापार, रा. सरस्वती कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. हसन मोहसिन बावजीर, वय ५१ वर्षे, धंदा व्यापार, रा. सरस्वती कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. शेख नुरजहा बेगम अमर बिन सईद, वयं ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. आजम कॉलनी, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ५. जाबरी समीना अमरबीन, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. युमील कंपाऊंड संगम सिनेमा, पांचल मोती तलाव रोड, भावनगर गुजरात

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी डि. के. साळवे कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की, मयत शेख मोहसिन शेख हसन हे अर्जदार नं. १ ते ५ यांचे वडील असून अर्जदार क्रं. ४ व ५ या विवाहीत मुली आहेत. मयत मोहसिन शेख हसन हे आजार पणाने दि. ३०.१२.२०१० रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मयत शेख मोहसिन शेख हसन यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. शेख मोहसिन शेख हसन हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय, नगरपालिका कार्यालय, तलाठी कार्यालय, ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ३ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक ३०/७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## अग्रलेख...

# राष्ट्रसमर्पित मातृहृदयी जीवनाची अखेर..

राष्ट्र सेविका समितीच्या चतुर्थ प्रमुख संचालिका प्रमिलताई मेढे यांच्या निधनामुळे एका राष्ट्रसमर्पित मातृहृदयी जीवनाचा आज अंत झाला आहे. आपले राष्ट्र, आपली माणसे व समिती यांचाच विचार करीत जवळजवळ सात दशके समितीच्या सेविका म्हणून त्या जगल्या. अखेरचा श्वासही त्यांनी अशा दिवशी घेतला, ज्यादिवशी भारतीय राजकारणात 'भगवा आतंकवाद' हा शब्दप्रयोग निष्प्रभ झाला. ज्या मालेगाव बॉम्बस्फोटाच्या निमित्ताने 'भगवा आतंकवाद' शब्द भारतीय राजकारणात रुजविला गेला, त्या बॉम्बस्फोटातील सर्व आरोपींना न्यायालयाने मुक्त केले आणि एकप्रकारे या अनुचित अस्तित्वहीन संकल्पनेवर संपूर्णपणे फुली मारली. प्रमिलताई यांनी शेवटचा श्वास घेतला, त्याच दिवशी अंतराळ क्षेत्रातही भारताने नवीन इतिहास प्रस्थापित करून आपला झेंडा संपूर्ण जगभर फडकता ठेवला आहे. एकुणात आपले प्रस्थान त्यांनी ऐतिहासिक दिवशी निश्चित केले, असे म्हणता येईल.

बालपणापासून प्रमिलताई या सेविका होत्या. सेविका म्हणून मिळतील त्या जबाबदाऱ्या स्वीकारीत होत्या. सेविका म्हणून कार्यरत असतानाच त्या बी.ए. बी.टी. झाल्या आणि नागपूरच्या सी. पी. ॲण्ड बेरार विद्यालयात शिक्षिका झाल्या. दोन वर्षे शिक्षिका म्हणून काम केल्यावर त्यांनी केंद्र सरकारच्या डीएजीपीटी कार्यालयात सीनियर ऑडिटर म्हणून नोकरी पत्करली. या कार्यालयातील कामात कोटा पद्धती असल्यामुळे निर्धारित काम पूर्ण केल्यावर ऑफिसबाहेर पडता येत असे. त्याचा फायदा घेत प्रमिलताईंनी समितीचे काम नागपूरमध्ये वाढविले होते. या संपूर्ण कालखंडात त्यांचा मुक्काम त्यांचे बंधू बापू महाशब्दे यांच्या घरी असे. एका टप्प्यावर त्यांनी ठरविले की, आता घरी न राहता आपल्याला प्रचारकी जीवनाचा अंगीकार करायचा आहे. त्यामुळे प्रमिलताई १९६५ साली अहिल्या मंदिरात म्हणजेच समितीच्या मुख्यालयात राहायला आल्या. त्यांची कर्मस्थळी असलेल्या याच भवनात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. प्रमिलताईंनी प्रचारक जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा बापूंच्या घरातून निघणे हा कठोर आणि कठीण निर्णय होता. बापूंच्या आई या निर्णयाविरुद्ध होत्या. बापूंनी अतिशय स्पष्टपणे सांगितले होते की ही अहिल्या मंदिरात जाणारच असेल तर तिने तुझ्या मृत्यूनंतर जावे असा तुझा आग्रह का?...तसे झाले तर लोक म्हणतील की, आई गेल्यावर भावाने आणि वहिनीने तिला घालविले. असे होऊ नये म्हणून तुझ्या समोरच तिला राष्ट्रकार्यासाठी जाऊ दे. ती राहील अहिल्या मंदिरात आणि ऑफिस संपल्यानंतर तुला भेटायला येत जाईल. यानंतर १९६५ साली प्रमिलताई अहिल्या मंदिराच्या रहिवासी झाल्या आणि मग सुरू झाला वंदनीय मावशी म्हणजेच मावशी केळकर यांच्यासोबतचा त्यांचा प्रवास. वं. मावशींची पत्रेही प्रमिलताई तयार करीत. अत्यंत वळणदार व सुरेख अक्षर आणि नेमकेपणा याबद्दल ती पत्रे ओळखली जात. त्याच्या मागे प्रमिलताई होत्या हे मात्र अन्य कुणालाही ज्ञात नव्हते. अहिल्या मंदिरात त्यांच्यावर विविध जबाबदाऱ्या आल्यात. १९७८ पासून म्हणजे आणिबाणी संपल्यानंतर जवळजवळ २५ वर्षे २००३ पावेतो त्या अखिल भारतीय प्रमुख कार्यवाहिका होत्या. या जबाबदारीसह त्यांनी संपूर्ण भारतभर सतत प्रवास केला. उत्तर प्रदेश आणि जम्मू-काश्मीर या भागावर त्यांचे विशेष लक्ष होते. त्याचे विशेष दायित्व प्रमिलताईंवर होते. त्या साधारणतः ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये प्रवासाला निघत आणि फेब्रुवारीमध्ये समितीच्या अखिल भारतीय बैठकीसाठीच नागपूरला परत येत. बैठक संपली की पुन्हा प्रवासाला निघत. पण, या संपूर्ण प्रवासात त्या इतके नेमके सामान घेऊन जात, की कधीही कोणतेही सामान त्यांना अन्य गावाला पाठवावे लागले नाही. वातावरणातील कोणताही बदल त्या सहजतेने स्वीकारीत. २००३ च्या फेब्रुवारीत त्यांच्यावर सहप्रमुख संचालिका ही जबाबदारी आली आणि २२ जुलै २००६ रोजी त्या प्रमुख संचालिका झाल्या. समितीच्या कामासाठी त्यांनी इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका या देशांचाही प्रवास केला. या सर्व प्रवासांत त्यांनी नऊवारी पातळ हा आपला भारतीय आणि महाराष्ट्रीय पोशाख कधीच बदलला नाही. प्रमिलताईंचे वैशिष्ट्य असे की, त्या हजारो स्वयंसेवक आणि समितीच्या सेविकांचे मातृस्थान होत्या. मनातील सर्व गोष्टी बोलून टाकण्याचे आणि दिलाशाचे शब्द ऐकण्याचे ते हक्काचे स्थान होते. म्हणतात ना की 'माय मरो पण मावशी जगो'; ते प्रमिलताईंसाठी शंभर टक्के लागू होते. मातृत्वाला आपल्या चिंतनातून त्या सर्वश्रेष्ठ स्थान देत असत. घरोघरी आदर्श माता झाल्या तरच राष्ट्राचा विकास होईल हे त्या आवर्जून सांगत. जननी, जन्मभूमी, गंगामाता, गीतामाता, गोमाता, तुलसी माता, भारत माता अशा अनेक मातांची संकल्पना आपल्या देशात व संस्कृतीत आहे, हे त्या आवर्जून प्रत्येक भाषणातून सांगायच्या. स्त्री म्हणजे देशाची व घराची प्राणशक्ती आहे, असे प्रतिपादन त्या करीत असत. त्यामुळेच महिलांनी कसे वागावे, कसे दिसावे, समाजात कसे वावरावे याबाबतही त्या अत्यंत आग्रही होत्या. भारतीय श्रीनिकेतन नागपूर व जबलपूर या शैक्षणिक प्रकल्पांच्या त्या प्रमुख मार्गदर्शक होत्या. त्यातूनही स्त्रीची प्रतिमा तेवढीच उज्ज्वल आणि उत्तम, शालीन राहील याकडे त्यांचा कटाक्ष होता. पंजाबमध्ये खलिस्तानी अतिरेक्यांच्या कारवाया सुरू असताना मोगा येथील संघ शाखेवर गोळीबार करून अतिरेक्यांनी स्वयंसेवकांचे प्राण घेतले. त्यामुळे वातावरण खूपच तणावपूर्ण झाले होते. पंजाबमध्ये जाणे आव्हानात्मक असतानाही प्रमिलताईंनी नागपूरच्या पाच सेविकांना मोगा येथे पाठविले. त्या तेथे स्वयंसेवकांच्या परिवारात राहिल्या आणि संपूर्ण देशातील मातृशक्ती तुमच्यासोबत असल्याचा विश्वास त्या सेविकांनी तिथल्या कुटुंबांना दिला. त्यांच्या मातृहृदयाची याशिवाय आणखी कोणती साक्ष द्यायला हवी?

वं. मावशी या त्यांच्या प्रेरणास्रोत. वं. मावशींच्या जीवनावरील प्रदर्शनी घेऊन त्यांनी २६६ दिवसांची भारत परिक्रमा केली. देशभरातील ३२ प्रांतांत २८ हजार किलोमीटर्स प्रवास करून १०७ जागांवर त्यांनी ही प्रदर्शनी लावली. या प्रवासात त्यांनी अनेक सार्वजनिक सभांमध्ये भाषणे दिलीत. अनेक शैक्षणिक संस्थांना भेटी दिल्या. शैक्षणिक परिसंवादांत भाग घेऊन वं. मावशींच्या कर्तृत्वाची जाणीव जगाला करून दिली. २२ जुलै २००६ या दिवशी त्या राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका झाल्या. 'माननीय प्रमिलताईं'च्या त्या 'वंदनीय प्रमिलताई' झाल्या. त्या दिवशीही त्यांच्या मनात खूप उल्हास होता असे नाही. तशीच स्थितप्रज्ञता २० जुलै २०१२ रोजीही होती. जेवढ्या सहजतेने त्यांनी दायित्व स्वीकारले होते, तेवढ्याच सहजतेने त्या दायित्वमुक्त झाल्या. त्यानंतरही जिथे काही कमी तेथे आम्ही अशाच पद्धतीने त्या समितीच्या सेविका म्हणून जगत राहिल्या. प्रकृती साथ देईनाशी झाल्यावर त्यांनी प्रवास थांबविला. अहिल्या मंदिरात पूर्वांचलातील बालिकांसाठी आणि मुलींसाठी जे वसतिगृह चालविले जाते, त्याची त्या काळजी घेऊ लागल्या. तिथल्या मुलीही अगदी सहजतेने मातृहृदयी प्रमिलताईंना बिलगत असत व मनातील विविध स्पंदने त्यांना सांगत असत. त्या लहान मुलींना कुटुंबाची, आई-वडिलांची आठवण येऊ देऊ नये याची पूर्ण दक्षता प्रमिलताई घेत असत. वसतिगृहातील पूर्वांचलातील या बालिकांना आणि मुलींना एखाद्या पालकासोबत सुटीच्या काळात घरी पाठविले जात असे आणि तेच पालक सुटी संपल्यावर त्यांना घेऊन नागपुरात येत असत. या मुलींना व पालकांना रेल्वेच्या चाईल्ड हेल्पलाईनने उतरवून घेतले, त्यावेळी प्रमिलताई खूप अस्वस्थ झाल्या होत्या. अशाप्रकारच्या कायद्यांतून रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्थांना त्रास दिला जाऊ नये, अशी व्यथा त्यांनी तरुण भारतच्या माध्यमातून सरकारसमोर मांडायला सांगितले होते. त्यासाठी त्यांनी तरुण भारतने लिहिलेल्या अग्रलेखाची सरकार दरबारी नोंद घ्यायला लावली. या प्रसंगानंतर कधीही वसतिगृहाच्या मुलींना अशाप्रकारे गाडीमधून उतरविले गेले असे झाले नाही. वयोमानाप्रमाणे प्रमिलताईंची प्रकृती खालावू लागली होती. दोनदा पडल्यामुळे शस्त्रक्रिया कराव्या लागल्या होत्या. त्याचा परिणाम त्यांच्या घरगुती भेटीगाठी व सार्वजनिक कार्यातील उपस्थितीवर झाला होता. मात्र, त्यांच्या बौद्धिक जागरूकतेवर आणि प्रखर सामाजिक जाणिवांवर शेवटपर्यंत कुठलाही परिणाम झाला नव्हता. गेल्या तीन महिन्यांपासून त्या बिछान्याला खिळल्या होत्या; पण त्याही अवस्थेत त्यांच्या भेटीगाठी सुरू होत्या. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते, की मला कुठल्याही हॉस्पिटलमध्ये किंवा जीवन वाढविणाऱ्या प्रणालीवर कधीही ठेवू नका. मृत्यूच्या दिवशीही सकाळी समितीची प्रार्थना वगैरे आटोपून त्यांनी अतिशय शांतपणे शेवटचा श्वास घेतला आणि एका राष्ट्रसमर्पित जीवनाचा अंत झाला. जीवन देशाला अर्पण करणे म्हणजे काय असते याचा आदर्श प्रमिलताईंनी जीवनातून आणि मृत्यूतही घालून दिला. त्यांची शेवटची इच्छा देहदान करण्याची होती. त्यानुसार त्यांनी आपल्या कुडीचा पुढील पिढीला ज्ञानासाठी उपयोग व्हावा असा मार्ग स्वीकारला. अशा राष्ट्रसमर्पित जीवनाला दै. तरुण भारत व तरुण भारतचे प्रकाशन करणाऱ्या श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ▮

## प्रासंगिक

**दिनेश गुणे**

# कलंकशुद्धीचा मुहूर्त

कोणत्याही एखाद्या न केलेल्या गुन्ह्याची कबुली देण्याकरिता अनन्वित अत्याचार, वेदना आणि मानसिक दबाव सोसूनही जी मने खंबीर राहतात आणि आपल्या निर्दोषत्वाशी प्रामाणिक राहून केवळ मानसिक दृढतेने अत्याचार सहन करतात, त्यांच्या प्रामाणिकतेची न्याय कदर करतो, हे मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील सातही आरोपींच्या निर्दोष मुक्ततेवरून आज पुन्हा एकदा सिद्ध झाले. केवळ राजसत्तेच्या हुकूमाची ताबेदारी करण्याच्या उद्देशाने कोणासही उचलावे आणि एखाद्या गुन्ह्यात आरोपी म्हणून तुरुंगात डांबून गुन्ह्याची कबुली वदवून घेण्यासाठी त्याच्यावर असह्य अत्याचार करावेत ही तपास यंत्रणांची पद्धती यापुढे न्यायाच्या तराजूत टिकणारही नाही, हेदेखील सिद्ध झाले. सतरा वर्षांपूर्वी, २९ सप्टेंबर २००८ च्या रात्री साडेनऊच्या सुमारास मालेगावातील एका चौकात झालेल्या भीषण बॉम्बस्फोटात मृत्यू पावलेल्या दुर्दैवी जीवांच्या नावावरून पुढे तपासाच्या राजकारणाने जी वळणे घेतली, त्यामुळे राजकारणाचा एकूणच स्तर पुढच्या काळात उघड होत गेला आणि जातिधर्माच्या नावाने केल्या जाणाऱ्या राजकारणातून कोणाही एका समाजसमूहास अकारण बदनाम करून त्याविरोधात गैरसमजांचे विष पेरण्याचा विमर्श किती खालचा थर गाठू शकतो, हेही उभ्या देशाने अनुभवले. या स्फोटात सय्यद अहमद, मुश्ताक शेख युसूफ, शेख रफिक शेख मुस्तफा, फरहीन शेख लियाकत, इरफान झियाउल्लाह खान, हारून मोहंमद शाह या नागरिकांचा बळी गेल्यानंतर लगेचच तपास यंत्रणांची चक्रे ज्या वेगाने एकाच दिशेने फिरली, ते पाहता, आरोपी निश्चित करण्याची काही योजनापूर्वक मोहीम हाती घेतल्याचा संशय व्यक्त केला जात होताच, पुढे या गुन्ह्याचे सूत्रधार, गुन्हेगार आणि साथीदार म्हणून जी नावे तपास यंत्रणांच्या शोधमोहिमेतून पुढे येऊ लागली, तसतसा हा संशय बळावतही गेला आणि प्रत्यक्ष आरोपी म्हणून ज्यांना ताब्यात घेण्यात आले, तेव्हा त्या संशयावर शिक्कामोर्तबही झाले. एवढेच नव्हे, तर हा बॉम्बस्फोट हिंदू दहशतवाद्यांनी घडविला, असा एक विमर्शदेखील माडला जाऊ लागला. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री पी. चिदम्बरम आणि सुशीलकुमार शिंदे, दिग्विजय सिंह आदी नेत्यांनी तर त्याचे भगवा आतंकवाद असे नामकरणही करून टाकले आणि हिंदू समाजातही आतंकवादी कारवाया घडविणारे माथेफिरू असल्याचा सिद्धांत मांडला जाऊ लागला. त्याआधी देशात जेव्हा जेव्हा दहशतवादी कारवाया घडविल्या गेल्या, त्यामागे पाकिस्तानचा हात असल्याच्या आणि या दहशतवाद्यांना पाकिस्तानातून शस्त्रपुरवठा व प्रशिक्षण पुरविले गेल्याची बाब स्पटपणे दिसू लागल्यानंतरही राजकारणातील सत्ताधाऱ्यांच्या ताटाखालची जी मांजरे त्या दहशतवाद्यांच्या धर्माचा उल्लेख करण्यास कचरत होती, त्यांना अचानक हिंदू दहशतवादाचा साक्षात्कार झाला आणि दहशतवादाला हिंदूंचा भगवा रंगदेखील देऊन टाकला गेला. दहशतवादास धर्म नसतो हे खरेच आहे. दहशतवादास रंगदेखील नसतो हेदेखील खरे आहे. पण मालेगावच्या घटनेअगोदर घडलेल्या दहशतवादी कारवायांच्या काळात तशी आग्रहपूर्वक चर्चा करणाऱ्यांनी अचानक दहशतवादास भगवा रंग आणि हिंदू धर्म चिकटवून टाकला आणि देशाच्या व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील व महत्त्वाच्या मुद्द्यावरही राजकारण कसे करावे याचा वस्तुपाठही आखून टाकला.

मालेगावच्या स्फोटात आरोपी ठरविल्या गेलेल्या भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, अजय राहिलकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी आणि सुधाकर धर द्विवेदी या सातही जणांना निर्दोष ठरवून गुरुवारी एनआयए न्यायालयाने त्यांची मुक्तता केली आणि सतरा वर्षांपासून भगव्या दहशतवादाच्या नावाने पसरविल्या गेलेल्या एका खोटारडेपणाचा मुखभंग झाला. काँग्रेसचे तत्कालीन केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी हिंदू दहशतवादाचा उल्लेख केल्यानंतर त्याचा पुनरुच्चार करण्याच्या अहमहमिकेत काँग्रेसी राजकारणाचा असा वारसा असलेल्या अनेकांनी भाग घेतला होता. पुढे सुशीलकुमार शिंदे यांच्या राजकारणाला ओहोटी लागली, त्यांच्यावर निवृत्तीची वेळ ओढवली आणि काँग्रेसच्या संधिसाधू राजकारणातील आपली उपयुक्तता संपल्याचा साक्षात्कार झाल्यानंतर त्यांनी भगव्या आतंकवादाचा विमर्श प्रस्थापित करण्याच्या आपल्या कृतीचा पश्चात्ताप व्यक्त केला ही बाब वेगळी, पण केवळ शिंदे यांच्या दिलगिरीमुळे हिंदू समाजावर उडविले गेलेले हे शिंतोडे स्वच्छ होणार नव्हते. एनआयए न्यायालयाच्या गुरुवारच्या निकालामुळे आता ते पूर्ण झाले असून सहिष्णुतेच्या संस्कारांचा वारसा ल्यालेल्या हिंदू समाजावर सरसकटपणे लादला गेलेला हा हीन आरोप पुसला गेला आहे. गुन्हेगारीचा आरोप असलेल्यांवरील आरोपांची न्यायालयाकडून शहानिशा केली जाते, तपास यंत्रणांना समोर मांडलेल्या साक्षी, पुराव्यांची छाननी केली जाते आणि न्याय व्यवस्था आपला निष्पक्ष निर्णय देत असते. या बॉम्बस्फोटानंतर तत्कालीन सत्ताधाऱ्यांनीच संपूर्ण हिंदू समाजासच दहशतवादाचा रंग देऊन एकतर्फीपणे दोषीदेखील ठरवूनही टाकले. सुशीलकुमार शिंदे यांनी याबाबत दिलगिरी व्यक्त करताना या हीन राजकारणाचा उलगडा केला आहे. भगवा आतंकवाद सुरू होत असल्याचा दावा करण्यासाठी पक्षाकडूनच संकेत मिळाले होते, असा खुलासा करून शिंदे यांनी या बेफाम आरोपाच्या कर्तेपणापासून स्वत:स दूर केले असले, तरी भगवा आतंकवाद हा शब्द रुजविण्याचे काँग्रेसचे धोरणच होते, हे त्यांच्या त्या गौप्यस्फोटातूनही स्पष्ट झाले होते.

साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर आणि कर्नल पुरोहित यांच्यावर लादले गेलेले आरोप सिद्ध झालेच नाहीत, तर या गुन्ह्याचा पंचनामादेखील योग्य पद्धतीने झाला नाही, काही वैद्यकीय प्रमाणपत्रांमध्ये फेरफार झाल्याचे निदर्शनास आले, तर स्फोटासाठी जी दुचाकी वापरली गेल्याचा तपास यंत्रणांचा दावा होता, ती दुचाकी साध्वी प्रज्ञा सिंह यांच्या मालकीची असल्याचा दावाही सिद्ध झाला नाही. अन्य अनेक बाबींतून तपास यंत्रणांनी रचलेले कथानक न्यायालयासमोर टिकाव धरू शकलेले नाही, हेही या निकालातून स्पष्ट झाले आहे. साध्वी प्रज्ञा सिंह यांच्यावर तपासादरम्यान झालेल्या शारीरिक आणि मानसिक अत्याचाराच्या खुणा या काळात स्पष्ट झाल्या आणि तपास यंत्रणांना हवे तसे कबुलीजबाब देण्यासाठी संशयित म्हणून ताब्यात घेतलेल्यांना कोणत्या स्थितीस सामोरे जावे लागते, हेही या निमित्ताने उघड झाले. या खटल्याच्या तपासादरम्यान सुनावणीसाठी न्यायालयाकडून बोलावणे आल्यानंतर प्रज्ञा सिंह यांनी गेल्या वर्षी समाजमाध्यमावरून आपले छायाचित्र प्रसिद्ध केले होते. काँग्रेसी सत्तेने केलल्या अनन्वित अत्याचाराची फळे केवळ काही काळापुरती नव्हे, तर आयुष्यभर आपल्यासोबत वेदनांच्या रूपाने राहणार आहेत, असे त्यांनी त्यामध्ये म्हटले होते. सुजलेला चेहरा, मेंदूला आलेली सूज, दृष्टिदौर्बल्य, श्रवणशक्तीची हानी आणि सततच्या औषधोपचारांच्या परिणामांमुळे जडलेल्या शारीरिक व्याधींसोबत आपण जगत असून या परिस्थितीत जिवंत राहिले, तर मी न्यायालयातील सुनावणीस हजर राहीन अशी हतबल भावना त्यांनी व्यक्त केली होती. अशा यातनामय तुरुंगवासात जर त्यांचे मानसिक धैर्य संपुष्टात आले असते व गुन्हा कबूल करण्याचा दबाव झेलला नसता, तर या यंत्रणेने आणखी किती जणांना गुन्हेगार ठरविले असते याची कल्पनाच करवत नाही, अशा शब्दांत उमा भारती यांनी माध्यमांसमोर व्यक्त केलेल्या भावना पाहताना अनेकांना अश्रू आवरणे शक्य झाले नव्हते. केवळ राजकारणातून या गुन्ह्यास वेगळे वळण देण्याचे असे प्रयत्न राजकीय संस्कृतीसमोरील आव्हाने ठरतात, यात शंका नाही. मी माझ्या पक्षाच्या सांगण्यावरूनच भगवा दहशतवाद हा शब्द तेव्हा वापरला होता, अशी कबुली सुशीलकुमार शिंदे यांनी दिली आहेच, पण, आपल्या पक्षाने, म्हणजे काँग्रेसने हा शब्द रुजविण्याचे कारण काय असावे ते मात्र आपल्यास ठावूक नाही, असेही त्यांनी गेल्या वर्षी एका मुलाखतीदरम्यान म्हटले होते. अनेक दशके काँग्रेसी राजकारणात आणि संस्कृतीत मुरलेल्या शिंदे यांना पक्षाची यामागील नेमकी नीती ठावूक नसावी हे आश्चर्यकारक आहे. आता या आरोपाचे मळभ दूर होऊन भगव्या परंपरेवरील कलंकशुद्धीचा दिमाखदार मुहूर्त साधला गेला आहे, ही आनंददायक बाब आहे. ▮

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# गाव ते गावच करी राव..!

शहरांनी स्पर्धा सुरू केली. गावांनीही कूस बदलली असली तरी गावाने आपल्या सीमा मात्र बदलल्या नाहीत. माणुसकीचे दर्शन शहराच्या तुलनेत आजही गावखेड्यात झाल्याशिवाय राहत नाही. गोष्ट तशी फारच छोटी असली तरी गावात मनाचा मोठेपणा नांदत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचा अमृत महोत्सव व दै. तरुण भारतच्या शताब्दी वर्षानिमित्त विविध पर्यावरणविषय अभियान राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात बीज अंकुरे अंकुरे अंतर्गत वृक्षांच्या बिया जमा केल्या आणि त्या वाटल्याही. त्या बिया सहज फेकून दिल्या तरी कुठे ना कुठे उगवेलच. दुसरे अभियान वट सावित्रीनिमित्त वट रोपटे वाटप तेवढ्याच ताकदीने विदर्भात राबवण्यात आले. या वट रोपटे वाटप अभियानातून जमलेल्या मैत्रीनेच आज हा लेखनप्रपंच.

वर्धेनजीक असलेल्या आंजी मोठी येथील सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी बावने यांच्याशी संपर्क झाला. त्यांनी शासकीय नर्सरीतील वडाचे रोपटे उपलब्ध करून दिले. आता तरुण भारतच्या अभियानातील तिसरा आणि महत्त्वाचा टप्पा म्हणजे मंदिर स्वच्छता अभियान आणि तुळस लावा पर्यावरण वाचवा हे अभियान. तरुण भारत तुळशी रोपटे जमा करून त्याचे वाटप करणार आहे. या अभियानात तरुण भारतली मिळालेली तुळशीची रोपटे आम्ही दोन दिवसांपूर्वी आंजी येथील वनविभागाच्या नर्सरीत नेऊन दिली. वेळ साधारण सकाळी ९.३० वाजताची. आम्ही दाम्पत्य नर्सरीत पोहोचलो. जवळचे तुळशीचे रोपटे तेथील कर्मचाऱ्याकडे देत होतो. नर्सरीत काम करीत असलेल्या महिला एकत्र बसून न्याहारी करीत होत्या. काही वेळात त्यापैकी एका महिलेने, 'या ना मॅडम जेवाले' एवढेच वाक्य उच्चारले आणि गावातील माणुसकीचे दर्शन झाले. प्रसंग छोटा असला तरी रोजीने काम करणाऱ्या अनोळखी महिलांनी या जेवाले म्हणण्याची दानत दाखवली जी शहरात क्वचितच पाहायला मिळते. शहर स्वप्ने विकते, गाव झोप देतं हे वाक्य ऐकताना वाटते, खरेच का? पण जरा खोलवर विचार केला की लक्षात येते. शहर आणि गाव यांच्यात फक्त भौगोलिक अंतर नाही, तर जीवनशैली, संस्कृती, मानसिकता आणि अर्थकारण यांचाही संघर्ष दडलेला आहे. भारतातील जवळपास निम्मी लोकसंख्या □ सुमारे ६६ कोटी शहरांत राहते आणि दरवर्षी जवळपास एक कोटी लोक गावातून शहरात स्थलांतर करतात. शहर ही बाजारपेठ आहे ती स्वप्न विकते. फक्त स्वप्न विकत नाही तर स्पर्धाही विकते. तिथे प्रत्येक गोष्टीची किंमत मोजावी लागते. पण गाव वेगळे असते. अजूनही भारताच्या सुमारे ५२ टक्के लोकसंख्या गावात राहते. महाराष्ट्रात सुमारे ६ ते□६.५ कोटी लोक अजूनही शेत, नदी, ओसरी, वाडा अशा गावांच्या घट्ट विणीत राहतात. तिथे संध्याकाळी सूर्यास्त झाला की घराच्या ओट्यावर, ओसरीवर माणसे जमतात. वाऱ्याच्या गार झुळकीत दिवसभराच्या कामाची चर्चा, किस्से, गप्पा चालतात. रात्री अंगणात पडले की गाढ झोप लागते. हेच तर गाव देतं नीट, खोलवर झोप. गावातही चिंता असतात. शेती, नापिकीचा धोका, शिक्षण आणि आरोग्याच्या मर्यादा. हिंगणघाट तालुक्यात सावली (वाघ) येथे एका माय- लेकाला राहायला घर नव्हते तर त्याच गावातील रायपुरे नामक व्यक्तीने त्यांना राहायला छोटे का होईना पण छत दिले होते. गावात कुणी आजारी पडले तर विचारायला शेजारच्या घरातील लोक येतात. शहरात अनेकदा शेजाऱ्याचे नाव सुद्धा माहीत नसते. शहरात जास्त पगार मिळतो. पण, त्याच्याशी जुळवून घेताना मनावरचा भारही वाढतो. आरोग्याच्या दृष्टीनेही गाव जास्त समृद्ध आहे. शहरात माणूस एकटा पडतो; गावात एकटेपणा येत नाही. मानसिक ताण वाढतो, तेव्हा माणसाला गरज असते बोलण्याची, ऐकवण्याची आणि गावात ती ऐकणारी माणसे असतात. गावात अजूनही शुद्ध हवा, मोकळे आकाश, हिरवा शिवार दिसतो. हीच हवा शरीराला आणि मनाला निवांत झोप देते. शहर आणि गाव यातले अंतर फक्त पगाराचे नाही. गाव देतं झोप, कारण गावाकडे अजूनही वेलकम होम म्हणणारी दारं सताड उघडी असतात. ओळखीचे वडाचे झाड असते, देवघर असते, शेणाने सारवलेली ओसरी असते जिथे शांत बसता येते. गावाचे जगणे साधे आहे. पण, त्यात समाधान दडले आहे. शहर माणसाला उंच उडायला शिकवते, गाव त्या उंच झेपेनंतर घरी परत आल्यावर ऊबदार कुशीत घेते. आणि म्हणूनच, शहर स्वप्ने विकते, गाव झोप देतं... तिथे उपाशी कोणाला पाहिले जात नाही... या जेवाले म्हटल्याशिवाय घास घेतला जात नाही आणि घ्या देवाचं नाव म्हटल्याशिवाय राहत नाही. गाव ते गावच राव... ▮

९८८१९०३७६५

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# आमदारांना झालंय तरी काय?

अलिकडे टीव्ही लावला किंवा वर्तमानपत्र उघडले तर काय दिसते? आमदारांच्या मारामाऱ्या, महायुती सरकारमधील रुसवेफुगवे. महाराष्ट्रात याशिवाय काहीच घडत नाही का? असा कोणाचाही समज होईल. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना हनी ट्रॅपची चर्चा सुरू झाली. कधी नव्हे ते दोन आमदारांच्या समर्थकांचे युद्ध विधानभवन परिसराने पाहिले. कोणी आमदार रमी खेळण्यात गुंग आहे तर कोणी कँटिन कर्मचाऱ्याला ठोकतो आहे. ऊठसूट आमदार प्रतिस्पर्ध्यांच्या भानगडी काढताहेत. आपल्या लोकप्रतिनिधींना झालंय तरी काय? महायुतीला या कामासाठी जनादेश मिळालेला नाही. सरकार चालवणाऱ्या महायुतीच्या आमदारांनाही जबाबदारीचे भान सुटावे यासारखी दुर्दैवाची गोष्ट नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकासाची गंगा येऊ घातली आहे. येत्या पाच वर्षांत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर पोहोचेल असा अंदाज 'मॉर्गन स्टॅनली' या प्रख्यात आंतरराष्ट्रीय संस्थेने नुकताच व्यक्त केला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत एक लाख ३० हजार कोटी रुपये एवढी विदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. विरोधी पक्ष हे सांगणार नाही. विरोधकांकडे ठोस मुद्दाच नाही. म्हणून मग ते वावड्या उठवत आहेत. खोटे नॅरेटिव्ह पसरवत आहेत. विरोधी पक्ष म्हणून हे ते करणारच. विरोधकांच्या डावपेचांना सत्तेतल्या महायुतीचे आमदार बळी पडत आहेत का? असे नसते तर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा होणार की नाही हा विषय तब्बल सात दिवस चालला नसता.

विधान परिषदेत कामकाज सुरू असताना माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमी खेळत होते असा व्हिडीओ शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी व्हायरल केला. विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले. पण सभागृहात मोबाईल पाहणे हा गुन्हा आहे का? हेच मुळात स्पष्ट नाही. काही वर्षांपूर्वी कर्नाटक विधानसभेत काही आमदार मोबाईलवर फिल्म पाहताना पकडले गेले होते. त्यावरून देशभर गदारोळ झाला. पण कोणाचाही राजीनामा झाला नाही. कोकाटेंचे केवळ तंबीवर निभावले. मुळात कोणता विषय किती ताणून धरायचा याचे भान साऱ्यांनीच ठेवले पाहिजे. पण राजकारण आडवे येते. विरोधकांना अजितदादांचे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायचा होता. त्यासाठी मुंडेंचे निकटवर्ती वाल्मीक कराड यांच्याविरोधात रान



पेटवले गेले. मुंडेंचा राजीनामा झाला आणि वाल्मीक कराड हा विषय मागे पडला. महाविकास आघाडी सरकारच्या काळातला सचिन वाझे तुम्हाला आठवत असेल. हा वाझे टार्गेट बनला तेव्हा 'वाझे ओसामा बिन लादेन आहे का?' असा प्रश्न तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला होता. 'त्याला आधी फाशी द्यायची आणि नंतर तपास करायचा का?' असा प्रश्न तेव्हा करणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत आज चार मंत्र्यांचा राजीनामा मागत सुटले आहेत. राऊत म्हणा, उद्धव ठाकरे म्हणा किंवा रोहित पवार म्हणा, यांना विचारले पाहिजे की, अशी वेळ तुमच्यावर आली तेव्हा तुम्ही काय केले? आता एकच 'भोंगा' वाजतो. महाआघाडीच्या काळात दोन दोन भोंगे वाजायचे. संजय राऊत आणि राष्ट्रवादीचे मंत्री नवाब मलिक रोज खोटेनाटे आरोप घेऊन मीडियापुढे यायचे. अशाच एका प्रकरणात या नवाब मलिक यांनी फडणवीसांना छेडले होते. फडणवीसांनी असा ॲटम बॉम्ब लावला की, या नवाबाला अनेक महिने तुरुंगात बसावे लागले. ईडीने मलिक यांना उचलले तेव्हा शरद पवार म्हणाले होते, ते आठवते? 'नवाब मलिक यांना अटक झाली तरी ते मंत्रिपदाचा राजीनामा देणार नाहीत' असे शरद पवारांनी जाहीरपणे सांगितले होते. तेव्हाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना ही जाहीर थप्पड होती. वादग्रस्त मंत्र्यांवर कारवाई का करीत नाही? असा प्रश्न सामान्य माणसाला सतावत असेल. त्यासाठी नैतिकतेचा आधार दिला जातो. ते साहजिक आहे. पण इथे भाजपच्या पाठिंब्याने महायुतीचे तीन पक्षांचे सरकार आहे. एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी हे दोन दोन मित्रपक्ष आहेत. त्यामुळे गुंतागुंत आहे. कोकाटे हे अजितदादांच्या कोट्यातले मंत्री आहेत. 'कोटा' हे या मित्रपक्षांचे मोठे संरक्षक कवच असते. बोलघेवड्या स्वभावामुळे कोकाटे वादग्रस्त अवश्य आहेत. मात्र कामे घेण्यात पुढे आहेत. फडणवीसांनी प्रत्येक खात्याला १०० दिवसांचा कार्यक्रम दिला होता. त्यात पहिल्या पाच खात्यामध्ये कोकाटे यांचे खाते आहे. त्यांनी ५० जीआर काढले, कृत्रिम बुद्धिमत्ता वापरायला सुरुवात केली. पण तोंडाने मार खाल्ला. या महिनाभरात ज्या घटना घडल्या त्यामुळे फडणवीस अस्वस्थ झाले नसते तरच नवल. 'आमदार माजले अशी लोकभावना झाली असल्याचे' त्यांनी सभागृहातच बोलून दाखवले होते. पण त्यात अतिशयोक्ती काय होती? विकासाच्या कामांची चर्चाच कुठे ऐकू येत नाही. कोणाचे डाग चांगले आहेत याची. 'तेरे डाग से मेरे डाग अच्छे है.' १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्या घटनेला आज ६५ वर्षे होत आहेत. आतापर्यंतच्या मुख्यमंत्र्यांनी या राज्याला काहीना काही ताकद नक्कीच दिली. पण आता फडणवीसांनी राज्याला विकासाच्या सुपर स्पीडवर आणून ठेवले आहे. वाढवण बंदरासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प फडणवीस सरकारने मार्गी लावला आहे. समृद्धी महामार्गानंतर शक्तिपीठ महामार्ग होतो आहे. दावोस येथे झालेल्या गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्रात १५ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत. कोणी रमी खेळला किंवा कोणी डुलकी दिली म्हणून विकासाचा रथ थांबणार नाही. पण त्या बहाण्याने आरडाओरडा करून आपण नकळत विरोधकांच्या हातचे बाहुले बनत आहोत हे बेताल वर्तन करणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. जनतेची निराशा कराल तर जनादेशाचा तो अपमान होईल. 'दिल्लीत नरेंद्र, राज्यात देवेंद्र' अशी घोषणा आपण देतो. फडणवीस हा कामाचा माणूस आहे. तुम्ही त्यांना काम करू देणार नाही तर ते दिल्लीला निघून जातील. फडणवीस, नितीन गडकरी हे नेते कामाला वाघ आहेत. आपल्याला त्यांना सांभाळता आले पाहिजे. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### राष्ट्र आणि धर्महित जपूया!

भारतीयांसाठी चातुर्मास म्हणजे अतिशय आध्यात्मिक वातावरणाचा, पूजा-पाठाचा आणि धार्मिक साधनेचा विशेष काळ असतो. या काळात अनेक प्रमुख सण येतात. त्यामुळे पूजेसाठी लागणारे विविध साहित्य जसे की उदबत्ती, धूप, दीप इत्यादी बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. त्यातही उदबत्ती आणि धूप यांना विशेष महत्त्व असते, कारण ते वातावरण शुद्ध करण्यासाठी वापरले जातात. मात्र अलिकडे काही परदेशी संशोधनातून असा दावा करण्यात आला आहे की, उदबत्तीचा धूर सिगारेटपेक्षा जास्त हानिकारक असतो आणि त्यामुळे कर्करोगाचा धोका संभवतो. हे संशोधन साऊथ चायना टोबॅको ग्वांगडोंग इंडस रेल्वे आस्थापनांनी संयुक्तपणे केले आहे. त्यांच्या अभ्यासात उदबत्तीच्या धुराच्या नमुन्यांमध्ये ९९ टक्के अतिसूक्ष्म कण आढळले, जे शरीरासाठी हानिकारक ठरू शकतात, असे निष्कर्ष नोंदवले गेले.


परंतु येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे गरजेचे आहे, हे संशोधन चिनी उदबत्त्यांवर आधारित आहे. चीनमध्ये तयार होणाऱ्या उदबत्त्यांमध्ये रासायनिक व घातक घटकांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. याउलट आपल्या भारतात अनेक आध्यात्मिक संस्था यज्ञातील विभूती, गोमूत्र, औषधी वनस्पती अशा नैसर्गिक आणि आरोग्यदायी घटकांचा वापर करून उदबत्ती तयार करतात. त्यामुळे हे संशोधन भारतीय उदबत्त्यांवर लागू होत नाही. त्यामुळे चातुर्मासातील सणांच्या पृष्ठभूमीवर बाजारात मिळणाऱ्या चायनीज उदबत्त्यांचे आकर्षण टाळावे. फक्त किंमत आणि देखाव्याला भुलून अशा घातक वस्तू खरेदी करू नयेत.

**रमा देशमुख**/नागपूर

●● ●●

### मैत्री भगवान श्रीकृष्ण-सुदामासारखी हवी

वर्षभर विविध प्रकारचे 'डे' साजरे करण्याची नवी पद्धत सर्वत्र रूढ झाली आहे. 'डे' साजरे करणे म्हणजे आठवणींना व समस्या यांना उजाळा देणे होय. परंतु 'डे' साजरे होतात, समस्या तशा राहतात. तेव्हा त्याचा पाठपुरावा करण्याकरिता 'डे'ची प्रथा आहे. सध्या मैत्री दिवस उत्साहात साजरा होतो. मित्र सुद्धा नेहमी बदलत असतात. शाळा, कॉलेज, ऑफिस



इतर क्षेत्रांत आपले वेगवेगळे नव्याने मित्र होतात. परंतु जुन्या मित्रांचा विसर पडता कामा नये. मित्रता भगवान श्रीकृष्ण व सुदामासारखी असली पाहिजे. श्रीमंत राजा व गरीब भक्तांचा राजमहालात भगवान श्रीकृष्णाच्या घरी जो आदर, सत्कार झाला, प्रेम कायम टिकून राहिले, त्या प्रेमाची शिकवण आपण मैत्री दिन साजरा करताना लक्षात घ्यावी.

**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

●● ●●

### चीनची नाचक्की

अलिकडेच बौद्ध धर्मीयांचे मोठे गुरू दलाई लामा यांनी त्यांचा उत्तराधिकारी त्यांच्या मृत्यूनंतर निवडला जाईल आणि तो चीनच्या बाहेरचा असेल, हे स्पष्ट केल्यामुळे चीनला मोठी चपराक बसली आहे. उत्तराधिकारी निवडीचा अधिकार गेडन फोड्रंग ट्रस्टकडे असल्याचे स्पष्ट करण्यात आले. भारताने दलाई लामा यांची पाठराखण केल्यामुळे या विषयात नाक खुपसणाऱ्या चीनची नाचक्की झाली आहे. कारण हा विषय बौद्ध समुदाय, तिबेटी परंपरा आणि दलाई लामा यांच्या अधिकारातील आहे. दहा वर्षांपूर्वी दलाई लामा यांनी ट्रस्टची स्थापना केली होती. गेल्या वर्षी दलाई लामा यांनी तिबेटची सर्वात पवित्र परंपरा रद्द केली जाऊ शकते किंवा त्यांचा उत्तराधिकारी महिला अथवा चीन बाहेरची व्यक्ती असू शकते, असे वक्तव्य केले होते. जगभरातील तिबेटी बौद्धांकडून दलाई लामा हे पद चालू ठेवावे, असे संदेश आले होते. १९५८ मध्ये तिबेटमधील खम्पा जमातीने उठाव केल्यानंतर ३१ मार्च १९५९ रोजी दलाई लामा यांनी भारतात आश्रय घेतला होता. ऑक्टोबर १९५९ मध्ये चीनमधील कम्युनिस्ट सरकारने लष्करी आक्रमणाद्वारे तिबेटचा ताबा घेतला. तिबेटी बौद्ध परंपरेनुसार दलाई लामा तेथील राज्यकारभार चालवत होते. चीनच्या राजघराण्यांनी ही परंपरा कायम राखली होती. चीनने दलाई लामा यांचे वर्चस्व कमी करण्यासाठी पंचेनलमा यांना बळ दिले होते. भारतात मोठ्या संख्येने राहणाऱ्या आणि जगभरात विखुरलेल्या तिबेटी समुदायातील लोकांना चौदाव्या दलाई लामांच्या वार्धक्याची जाणीव आहे.

दलाई लामांच्या निवडीमध्ये चीनने हस्तक्षेप केला तर त्यांच्यावर आर्थिक निर्बंध लादले जावेत, अशी तरतूद असणारा कायदा अमेरिकेने संमत केला आहे. तिबेटमधील साठ लाख जनता चौदाव्या दलाई लामांची अनुयायी आहेत. भारताने दलाई लामांना आश्रय दिलेला असल्यामुळे त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची चर्चा भारतात होणे स्वाभाविक बाब आहे. परंतु चीनला ही गोष्ट मान्य नाही. या मुद्द्यांवरून चीन आणि भारतामध्ये गेल्या काही काळापासून तणाव निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले आहे. तिबेटियन जनतेच्या धार्मिक भावनांचा आदर चीनने ठेवला पाहिजे, ही बाब भारताने चीनला निक्षून सांगण्याची गरज आहे. ▮

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### भारतीय जनता पार्टीची महानगर जिल्हा कार्यकारणी जाहीर

#### जम्बो कार्यकारणी : ५६ कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीची महानगर जिल्हा कार्यकारणी घोषित करण्यात आली असून या जम्बो कार्यकारणीत ५६ कार्यकर्त्यांना विविध पदांसह आघाड्यांच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी प्रस्तावित जिल्हा कार्यकारणी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना सादर केली. त्या पाठोपाठ प्रदेश पातळीवरुन कार्यकारणीस अधिकृत मान्यता मिळाल्यानंतर घोषणाही केली. ती कार्यकारणी पुढील प्रमाणे...

महानगरअध्यक्ष शिवाजी भरोसे, उपाध्यक्ष मोकिंद खिल्लारे, ओंकार देशमुख, रितेश जैन, शेख निहाल, रुपाली ठाकरे, सुप्रिया मांडे, अक्षय डहाळे, उमेश शेळके, सरचिटणीसपदी ॲड. एन.डी. देशमुख, भालचंद्र गोरे, शंकर आजेगावकर, मंगल मुदगलकर, चिटणीसपदी विजय गायकवाड, अजिंक्य औंढेकर, आनंद वर्मा, मुकेश गाढे, बालिका सुरनर, सुकेशिनी चौधरी, उषा चव्हाण, डॉ. नम्रता पाटील, कोषाध्यक्षपदी ज्ञानेश्वर बोबडे, प्रसिध्दी प्रमुख गणेश रणेर, कार्यालयीन प्रमुख ओंकार दुधाटे, सोशल मिडीया प्रमुख माऊली कोपरे, महिला मोर्चा प्रमुख मनिषा जाधव, युवा मोर्चा प्रमुख अजिंक्य गौंढेस्वार, ओबीसी मोर्चा प्रमुख गणेश टाक, अल्पसंख्यांक मोर्चा प्रमुख हम्मु चाऊस, एसस्सी मोर्चा प्रमुख सुमीत भालेराव, एसटी मोर्चा प्रमुख ओम मुदीराज, किसान मोर्चा प्रमुख अच्युत रसाळ, अल्पसंख्यांक महिला मोर्चा प्रमुख छाया मोगले, ओबीसी महिला मोर्चा प्रमुख सुनीता घुगे, कायदा प्रकोष्ट प्रमुख ॲड. सुरेश शिंदे, प्रज्ञा प्रकोष्ट प्रमुख शिवाजी लोखंडे, वैद्यकीय प्रकोष्ट प्रमुख डॉ. मनोज पोरवाल, शिक्षण संस्थाचालक प्रकोष्ट प्रमुख लक्ष्मीकांत क्षीरसागर, शिक्षक प्रकोष्ट प्रमुख श्रीधर कोके, भटके विमुक्त प्रकोष्ट प्रमुख किसनसिंग टाक, अपंग विकास प्रकोष्ट प्रमुख रावसाहेब धरणे, ज्येष्ठ कार्यकर्ता प्रकोष्ट धनंजय बल्लाळ, झोपडपट्टी सेल प्रमुख महेंद्र धबाले, कामगार सेल प्रमुख एकनाथ चव्हाण, व्यापारी आघाडी प्रमुख सचिन अंबिलवादे, सहकार आघाडी प्रमुख नामदेवराव चव्हाण, उत्तर भारतीय आघाडी प्रमुख ऋषिसिंह ठाकूर, सांस्कृतिक आघाडी प्रमुख सोहम खिल्लारे, उद्योग आघाडी प्रमुख शंतनु सुभेदार, अध्यात्मिक आघाडी प्रमुख संजय ओझरकर, जैन प्रकोष्ट श्रीकांत आंभोरे, बेटी बचाओ बेटी पढाओ सेल प्रमुख नसरीन पठाण, माजी सैनिक आघाडी प्रमुख गंगाशंकर फुटाणे, पंचायतराज सेल प्रमुख भानुदास जवंजाळ, ट्रान्सपोर्ट सेल प्रमुख बंटी नवल, पदवीधर प्रकोष्ट मुकुंद वसंतराव चौधरी आदींच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

### पोलिस मुख्यालयात २५२ निवासस्थानांच्या बांधकामाचा शुभारंभ

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील पोलिस मुख्यालयातील २५२ निवासस्थानांच्या बांधकाम प्रकल्पाच्या पायाभरणी व बांधकामाचा शुभारंभ गुरुवारी (दि.३१) नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शाहाजी उमाप यांच्याहस्ते करण्यात आला.

यावेळी जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजन अप्पर पोलिस अधिक्षक सुरज भाऊसाहेब गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी पोलिस उपअधिक्षक (गृह) अनिरुध्द काकडे, रा.पो. नि. रवी बान्ते, अन्वर शेरदिल, कौशल देशमुख आदींची उपस्थिती होती.१दरम्यान, या उपक्रमामुळे पोलिस कर्मचाऱ्यांसाठी निवासाच्या सुविधेत मोठी भर पडणार असून, त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे. परभणी पोलिस दलातील हा ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.

### बालाघाटातील अनुसूचित जमाती सेवा संघाचे मुख्यमंत्र्यांना साकडे : प्रमाणपत्रासाठी शासन निर्णयाची अपेक्षा

**परभणी,/प्रतिनिधी :** कोळी महादेव व कोळी मल्हार या अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याकरीता शासनाच्या तत्कालीन कायद्यानुसार कोळी नोंदी ग्राह्य धरुन प्रमाणपत्र वितरित करण्या संदर्भात शासन निर्णय निर्गमित व्हावेत, अशी मागणी बालाघाटातील अनुसूचित जमाती सेवा संघाच्या एका शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

आपल्या मागण्यांकरीता कोळी महादेव जमातीच्या वतीने अन्नत्याग, बेमुदत उपोषण वगैरे आंदोलने केली. परंतु, प्रशासकीय स्तरावर या संदर्भात गांभीर्याने दखल घेतल्या गेली नाही. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कोळी महादेव व कोळी मल्हार या जमातीस सन १९५० पूर्वी जात नोंदणीचे पुरावे मागून विविध जाचक दस्तऐवजाची मागणी करुन सर्व उपविभागीय अधिकारी या जमातीस प्रमाणपत्रापासून वंचित ठेवण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे अनुसूचित जमातीतील सर्व विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत, अशी खंत या सेवा संघाचे रमेश पिठलेवाड, गणेश सूर्यवंशी, निवृत्ती रेखडगेवाड, सतीश रेखडगेवाड, गोपिनाथ घोरपडे, अंबादास रेडेवाड, माधवराव उरतवाड, राजाराम पिठले, ओम मुदिराज यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जमातीच्या शिष्टमंडळाबरोबर मध्यंतरी बैठक बोलावून सन १९५० पूर्वीवरील जमातीच्या नोंदी कोळीत झालेल्या आहेत, हे मान्य केले आहे. हे सर्व निजाम राजवटीतील संशोधकांच्या व जनगणनेच्या नोंदीवरुन कोळी महादेव व कोळी मल्हार आहेत, असे असंख्य दस्तऐवज यापूर्वी शासनास सादर केले आहेत. त्या प्रस्तावांची तात्काळ अंमलबजावनी अपेक्षित आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# महसूल सप्ताहाच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी - पालकमंत्री मेघना साकोरे

## महसुन दिन साजरा- ०७ ऑगस्ट पर्यंत राहणार महसूल दिन - जिल्हाधिकारी यांची माहिती

**मोहन धारासूरकर**

**परभणी/प्रतिनिधी-** महसूल सप्ताहाच्या माध्यमातून शासनाच्या लोककल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा. तसेच परभणी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्न करुयात, असे आवाहन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महसूल सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी केले.



महसूल दिनानिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सभागृहात आज जिल्हा प्रशासनाच्यावतीने कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, महापालिका आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, अनिता भालेराव, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जीवराज डापकर, संगीता चव्हाण, शैलेश लाहोटी, तहसिलदार डॉ. संदीप राजापुरे एनआयसीचे देवेंद्रसिंह आदींसह महसूल विभागाचे अधिकारी, कमर्चारी उपस्थित होते. पालकमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, महसूल विभागामार्फत दि. १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिकांसाठी विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आपल्या जिल्ह्यात हा सप्ताह प्रभावीपणे राबवून सर्वसामान्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत तर त्याच धर्तीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र-२०४७ चे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमात आपण सर्वजण सहभागी होवूयात आणि देश व राज्यासह आपल्या परभणी जिल्ह्याला विकासात अग्रेसर करुयात. महसूल कर्मचाऱ्यांना आपल्या नोकरीच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा करण्याची उत्तम संधी मिळाली आहे, या संधीचा लाभ घेऊन कर्मचाऱ्यांनी तळागाळातील लोकांपर्यंत शासनाचे लोककल्याणकारी उपक्रम पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ द्यावा. तसेच मुख्यमंत्री यांनी दिलेल्या दीडशे दिवसांच्या कार्यक्रमाची जिल्ह्यात यशस्वीपणे अंमलबजावणी करावी, असे आवाहनही पालकमंत्री यांनी यावेळी केले. जिल्हाधिकरी रघुनाथ गावडे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना महसूल दिनाच्या शुभेच्छा देत महसूल सप्ताह यशस्वीपणे राबविण्याचे आवाहन केले. श्रीमती ढालकरी यांनी प्रास्ताविकात जिल्हा प्रशासनाने मागील वर्षात केलेल्या यशस्वी कामांचा लेखाजोखा मांडला व महसूल सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी महसूल विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी, उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी आणि गुणवंत पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### पहिल्या श्रावण सोमवारी वृक्षारोपण मोहिम जोमात

**जिंतूर,/प्रतिनिधी-** श्रीक्षेत्र मालेगाव दत्त मंदिर देवस्थान या ठिकाणी पालकमंत्री मेघनादिदीबोर्डीकर साकोरे यांच्या संकल्पनेतून तालुक्यात वृक्ष लागवड करण्याचे



ठरविले आहे व त्यावर किती साधून मालेगाव या ठिकाणी दत्त मंदिराजवळ माळावर उंबराचे वृक्ष लागवड करण्यात आली तसेच या ठिकाणी सभागृह सुद्धा बांधकाम करण्यात आले आहे त्याची पाहणी करण्यात आली. त्याची वेळी आणि श्री श्रीमाधवदास बाबा यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले मालेगाव हे दत्त मंदिर माळावर असल्यामुळे या मंदिराची देखभाल श्री श्री माधवदास बाबा हे करीत आहे यावेळी भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे पाटील यांनी जिंतूर तालुक्यात प्रत्येक गावात वृक्ष लागवडीचे करीत आहेत परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री यांचा संकल्प असून ते वृक्ष लागवड करीत आहेत यावेळी माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर यांचे सहाय्यक सचिव खेतरेआबा माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानदादा वटाणे सरपंच मोहनरावडे योगेश भाऊ बुधवंत महिला तालुका अध्यक्ष संगीता ताई जाधव सरपंच रमेश सकाळ सरपंच विश्वनाथ आडे सरपंच सांगू बाई मालेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते भास्कर थिटे सुधाकर आडे चेअरमन पिंटू भाऊ रमेश सडाळ मधुकर आडे अर्जुन आडे मंगेश बुधवार सुधाकर थिटे रवी आडे गजानन घुगे मानमोडीकर निळकंठ शिंदे राहुल आडे गोपीनाथ बुधवंत अधिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**परभणी : लोकशाहीर साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना आ.डॉ.राहुल पाटील, शहरप्रमुख ज्ञानेश्वर पवार, युवासेना शहरप्रमुख बाळराजे तळेकर, ज्येष्ठ नागरिक मंच अध्यक्ष रामराव डोंगरे, दलीत आघाडी शहर प्रमुख अमोल गायकवाड, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष मुळे, साळवे, गाडगे, राहुल गायकवाड व मान्यवरांची दिसत आहेत.**

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**परभणी,/प्रतिनिधी-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आयोजित 'छत्रपती फुले शाहू आंबेडकर महोत्सव समिती' मार्फत अभिवादन करण्यात आले. काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सुहास पंडित, दिगंबर खरवडे, शजी अहमद खान यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी सुहास पंडित यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर भाष्य करताना सांगितले की, ''अण्णाभाऊ साठे हे दलित, श्रमिक आणि वंचित घटकांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांच्या लेखणीने सामाजिक अन्यायाविरुद्ध जनजागृती केली. आजच्या काळात त्यांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत.'' कार्यक्रमाचे आयोजन साधेपणाने आणि उत्साहात पार पडले. छत्रपती शिवाजी महाराज,शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार या कार्यक्रमात घेण्यात आला.

### प्रथमेशला बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्णपदक

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व



बाबुराव पाटील महाविद्यालय, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने डी झोन बुद्धीबळ स्पर्धा मंगळवार दि.२९ रोजी संपन्न झाल्या.
या स्पर्धेत सोनपेठ येथील खेळाडू प्रथमेश शिवमल्हार वाघे याने सुवर्णपदक पटकावले आहे. कंधार येथे होणाऱ्या विद्यापीठ स्पर्धेस तो पात्र ठरला आहे.त्याच्या या यशाबददल प्राध्यापक, शिक्षक,पत्रकार, व्यापारी आदींनी अभिनंदन केले आहे.

### महसूल दिनानिमित्त तहसीलदार, तलाठी, वाहन चालक यांचा गौरव

**पूर्णा,/प्रतिनिधी-** महसूल प्रशासनात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल शुक्रवारी तहसीलदार माधवराव बोथीकर यांचा परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



शुक्रवारी परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठात महसूल दिनानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात परभणी जिल्ह्यातून महसूल विभागात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल तहसीलदार माधवराव बोथीकर यांचा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला या कार्यक्रमास परभणी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नितिशा माथुर, महापालिका आयुक्त धैर्यशील जाधव,अप्पर जिल्हाधिकारी प्रताप काळे,यांच्यासह जिल्ह्यातील विविध खात्याचे अधिकारी महसूल कर्मचारी आदी उपस्थित होते.यावेळी पूर्णा तालुक्यातील उत्कृष्ट तलाठी म्हणून गणेश गोरे तर उत्कृष्ट वाहनचालक म्हणून नंदकिशोर शेलाटे यांना सुद्धा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वे दुहेरी मार्गाला केंद्राची अंतिम मंजुरी

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** 'छत्रपती संभाजीनगर ते परभणी या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाला केंद्राची अंतिम मंजुरी मिळाली, ही केवळ परभणी जिल्हाच नाही तर संपूर्ण मराठवाड्यासाठी आनंदाची बातमी असून मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ओलांडणारी देखील आहे. जे स्वप्न गेली अनेक वर्षे मराठवाडावासियांनी पाहिले होते, ते मोदी सरकारच्या माध्यमातून आता पूर्ण होत आहे' अशी प्रतिक्रिया राज्यमंत्री आणि परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत छत्रपती संभाजीनगर ते परभणी या रेल्वेच्या दुहेरी मार्गाला अंतिम मंजुरी मिळाली असून यासाठी २,१७९ कोटी



रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी स्वतः केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. याच पाठपुराव्याला यश मिळाले असून १७७ किलोमीटरचा दुहेरी मार्ग साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पालकमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर पुढे म्हणाल्या, या मार्गासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करते. आता या मंजुरीमुळे दुहेरी मार्ग प्रत्यक्षात साकारणार असून छत्रपती संभाजीनगर ते परभणी यादरम्यान रेल्वे गाड्यांची संख्या वाढणार आहे'. 'दुहेरीकरणाचा फायदा केवळ नियमित प्रवाशांनाच नाही, तर शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि मराठवाड्यातील उद्योगांनाही होणार आहे. शिवाय रेल्वे गाड्यांची संख्या वाढल्यामुळे संपूर्ण मराठवाड्याची कनेक्टिव्हिटी आणखी मजबूत होण्यास मदत होणार आहे', असेही पालकमंत्री श्रीमती साकोरे बोर्डीकर म्हणाल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठवाड्याच्या विकासाला सातत्याने प्राधान्य देत असून मराठवाड्यातील पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याची आणखी एक पावती आहे. विशेष म्हणजे या मंजुरी प्रक्रियेत देवेंद्रजींचा पाठपुरावाही अतिशय महत्त्वाचा ठरला. मराठवाड्याच्यावतीने मी केंद्र सरकार आणि राज्यसरकारला मनापासून धन्यवाद देते, असेही पालकमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या.

TARUN BHART 02 august 2025 NEW:Copy of Layout 1 8/1/2025 8:23 PM Page 1



# गोरंट्याल यांनी घेतले 'खोके'? -खोतकरांचा स्फोटक आरोप



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या भाजप प्रवेशानंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी गोरंट्याल यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. आज जालन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत खोतकर यांनी गोरंट्याल यांच्यावर गंभीर आरोप करताना म्हटलं की, काँग्रेस सोडण्यासाठी या माणसाने किती पैसे घेतले? त्याचं उत्तर त्याने जनतेला दिलंच पाहिजे. खोतकरांनी गोरंट्याल यांच्या खासगी आयुष्याकडेही बोट दाखवत म्हटलं की, तू तुझ्या आईला मारताना किती त्रास दिला याच्या माझ्याकडे क्लिप्स आहेत. नगरपालिकेतील घोटाळ्यांचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी भाजपच्या स्थानिक नेत्यांनाही इशारा दिला. गोरंट्याल यांच्या नगरपालिकेतील गैरव्यवहारांची माहिती भाजपवाल्यांना नसेल, असं खोतकर म्हणाले.

गोरंट्याल यांचा भाजप प्रवेश म्हणजे प्रेम केलं एकाशी, संसार केला दुसऱ्याशी, असा टोला लगावत त्यांनी हा प्रेमविवाह फार काळ टिकणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. हा नेता आता जनाधारही गमावलेला आहे. तुम्ही कोणतंही चिन्ह घेऊन उभे रहा, तुमचं डिपॉझिट जप्त होईल, असा इशाराही खोतकरांनी दिला. तसंच, शेरोशायरी करणं त्याचं काम आहे, पण मी जनतेचं काम करतो. चारित्र्य हरण करायचा धंदा त्याचा आहे, अशा शब्दांतही त्यांनी गोरंट्याल यांच्यावर टीका केली. भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांनाही सावध करत, या बोकड्यापासून सावध राहा, असा अप्रत्यक्ष सल्ला त्यांनी रावसाहेब दानवेंना उद्देशून दिला. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही जालना महापालिकेवर भगवा फडकवणार आहोत, असा विश्वास खोतकरांनी व्यक्त केला. गोरंट्याल यांचा काँग्रेसमधून एक्झिट पक्षासाठी दिलासा असल्याचंही खोतकरांनी नमूद केलं. त्याने पक्ष सोडल्यानंतर जालन्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोकळा श्वास घेतलाय, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## पहिला महापौर शिवसेनेचाच होणार- विष्णू पाचफुले

» महानगरपालिकेवर पहिला महापौर शिवसेनेचाच होईल असा दावा शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचपुते यांनी केलाय महापालिकेची चौकशी लागल्यामुळे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी भाजपा प्रवेश केलाय आम्ही महायुतीचा धर्म पाळणारे लोक आहोत शिवसेना शहरप्रमुख विष्णू भाऊ पचफुले यांनी सांगितले आहे

# अण्णाभाऊ साठे यांनी लढण्याची प्रेरणा दिली -आ.अर्जुनराव खोतकर

## उत्सव समिती तर्फे लोकोपयोगी उपक्रमांनी जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

साहित्यरत्न, लोकशाहीर, अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती शुक्रवारी ( ता. ०१) जालना शहरासह जिल्हाभरात उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. जालना जिल्हा सर्व पक्षीय जयंती उत्सव समितीच्या वतीने डि.जे.मुक्त जयंती साजरी करत जुना जालना भागातील उड्डाणपुलाखाली असलेल्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर अभिवादन सो-हळा, गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी शिष्यवृत्ती, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य , महिलांना साडी, धान्यवाटप आणि रक्तदान शिबीर असे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.गायक अजय क्षीरसागर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य आणि कार्यावर आधारित बहारदार गीतांचे सादरीकरण करून जयंती उत्सवात रंगत भरली.

अभिवादन सोहळ्यास स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर ,उद्योजक घनश्यामदास गोयल,युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अप्पर पो-लीस अधीक्षक आयुष नेपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी,जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.पाटील, समितीचे अध्यक्ष रवी पांडव,सचिव विनोद आठवे ,कार्याध्यक्ष सचिन लोंढे ,कोषाध्यक्ष बालाजी पांडव, उपाध्यक्ष विक्की गवळी, अमोल पांडव,कैलास आठवे, मांगीलाल पाचीपांडव, सहसचिव रविराज पाखरे ,मनोज गुढेकर,सह कोषाध्यक्ष महेश जाधव, ज्येष्ठ नेते ड. शिवाजीराव आदमाने, अशोक साबळे,कृष्णा पांडव,विष्णू गवळी, पंडितराव भुतेकर ,भाऊसाहेब घुगे ,विष्णू पाचफुले,पांडुरंग डोंगरे, अनुराग कपूर, विजय जाधव, मेघराज चौधरी,सुनील साळवे ,संजूबाबा गायकवाड,अरविंद देशमुख,सुनील रत्नपारखे ,सरपंच रवींद्र ढगे, अंकुश राजगिरे, किरण शिरसाठ,शिवराज जाधव,सी.के.डोईफोडे,सचिन ( नन्नु) कांबळे,पिटर खंदारे, राजेंद्र जाधव,संजय इंचे,हरीश रत्नपारखे,किशोर कांबळे, योगेश रत्नपारखे, दीपक हिवाळे,संदीप खरात, करूणा नामवाड, ड. कल्पना त्रिभुवन, ड. रेखा कांबळे, द्वारका लोंढे,संदीप साबळे, संतोष परळकर, ड.अशफाक पठाण, आदींची उपस्थिती होती.

आ. अर्जुनराव खोतकर याप्रसंगी बोलतांना म्हणाले, दीन, दलितांवर होत असलेला सामाजिक अन्याय, त्यांना मिळत असलेली हीन दर्जा ची वागणूक, अशा प्रतिकूल परिस्थितीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी अनिष्ट प्रथांना मूठमाती देऊन कथा, कादंबऱ्या ,साहित्य, लोकनाट्य, शाहीरी , लोकगीते यामाध्यमातून संयुक्त महाराष्ट्र लढाईत योगदान देत लढण्यासाठी प्रेरणा दिली. असे सांगून उत्सव समितीने डीजे धांगडधिंगा न करता विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करून गरजवंतांना आधार दिला. या उपक्रमांचे आ. खोतकर यांनी कौतुक केले. आपण मातंग समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला असून आगामी महापालिका निवडणुकीत सुद्धा लोकप्रतिनिधित्व देणार असल्याची घोषणा आ. खोतकर यांनी करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल,जेष्ठ नेते अशोक साबळे,संजूबाबा गायकवाड, करूणा नामवाड ,यांची यावेळी समायोचित भाषणे झाली. प्रास्ताविक कृष्णा पांडव यांनी केले सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी तर समितीचे अध्यक्ष रवी पांडव यांनी आभार मानले. यावेळी समितीचे सदस्य सचिन कांबळे , विशाल पांडव ,कुलदीप जगधने ,श्याम सराटे, रवी रंधवे, राम हिवाळे, नितीन हिवाळे, शांतीलाल लोंढे, यांच्यासह महिला, तरुण नागरिकांची मोठ्या संख्येने उप-स्थित होते. दरम्यान माजी मंत्री राजेश टोपे, शिव-सेना उबाठाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर ,राजेंद्र राख, मुरलीधर थेटे, हरिहर शिंदे, माजी नगरसेवक सतीश जाधव, महेश निक्कम, सुहास मुंढे, निरंत पट्टेबहादुर, आदींनी सोहळ्यास भेटी देऊन शुभेच्छा दिल्या.

## » लेखणीचा दणका दिला शाहीरान!

आंबुजी पावर आंबुजी तोडा फेम गायक अजय क्षीरसागर यांनी रशिया केली दिवाणी,, माझ्या अण्णाभाऊंनी...! लेखणीचा दणका दिला शाहीरान,,जाळ अन् धूर संगच काढला..., अशा एकापेक्षा एक बहारदार गीतांचे सादरीकरण करून जमलेल्या हजारो बांधवांना मंत्रमुग्ध केले. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो..,क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा विजय असो.., अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

# संक्षिप्त



## राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयामध्ये आज दि.०१/०८/२०२५/ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती यांची साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण साहेब यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर, युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील भैय्या चव्हाण, विधानसभा अध्यक्ष प्रतापराव शिंदे,जालना जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर, प्रभाकर तांबे,युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे,शहर महिला जिल्हाध्यक्ष रिंकल तायड , शहर जिल्हा उपाध्यक्ष प्रता-पराव लहाने, बाळासाहेब तनपुरे, पाटील सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हांडे, भटक्या विमुक्त जाती जमातीचे जिल्हाध्यक्ष विजय सोनवणे,दलित आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्ष संगिता झाडीवाले, युवती कार्याध्यक्ष पल्लवी महाले, असंघटीत कामगार जिल्हाध्यक्ष सतीश वाहुळे,ओ.बी.सी. घनसावंगी तालुकाध्यक्ष मच्छिंद्र राठोड, ओबीसी जालना तालुका अध्यक्ष राहुल लष्कर,सेवादलाचे, सिद्धेश्वर शिंदे,गणेश डूकरे, राहूल राठोड आनंद मस्के मोहसीन लकी राजेश पवार अतुल गायकवाड प्रल्हाद थोरात,अब्दुल समी, संतोष गढे,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रांतातील ११ जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा गौरव-डॉ. साबू

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



रोटरी प्रांत ३१३२ च्यावतीने रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता मंठा रोडवरील हर्षवर्धन पॅलेसमध्ये विजयोत्सव पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील प्रख्यात व्याख्याते व माजी प्रांतपाल मोहन पलेशा हे उपस्थित राहणार आहे. त्यांच्या उपस्थितीत प्रांतातील ११ जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणारे क्लबचे पदाधिकारी यांच्यासह सर्वोत्कृष्ट सहाय्यक प्रांतपाल, सर्वोत्कृष्ट डिस्ट्रिक्ट डायरेक्टर, सर्वोत्कृष्ट क्लबचा गौरव करण्यात येणार आहे. यावेळी रोटरी परिवारातील सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी केले आहे.

जालना रोटरीच्या इतिहासात जालन्याला प्रथमच डॉ. सुरेश साबू यांच्या रूपाने प्रांतपालपद मिळाले आणि ११जिल्ह्याचा कार्यविस्तार असलेल्या प्रांतात त्यांच्या संकल्पनेतून १०२ रोटरी क्लबमार्फत अनेक नाविन्यपूर्ण सेवाप्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आले. अब की बार एक लाख पार या मधुमेह निदान चाचणी अभियानाने अवघ्या सात महिन्यातच उद्दिष्टपूर्ती केली. यासह अन्य सेवा प्रकल्पांसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या रोटरी परिवारातील सदस्यांच्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून त्यांच्या संकल्पनेतून प्रथमच आयोजित या कार्यक्रमात प्रारंभी रोटरीच्या वर्षभरातील उल्लेखनीय कार्याचा आढावा घेऊन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. समाजोपयोगी उपक्रम, प्रभावी नेतृत्व, संघटन कौशल्य यासाठी कार्य करणाऱ्या मान्यवरांना गौरवण्यात येणार आहे. सर्वोत्कृष्ट क्लब अध्यक्ष, सर्वोत्कृष्ट क्लब, सर्वोत्कृष्ट सहायक प्रांतपाल, सर्वोत्कृष्ट डिस्ट्रिक्ट डायरेक्टर यासह इतर अनेक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. रोटरीच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. रोटरीचे सामाजिक योगदान आणि एकत्रित यशाचे हे मोठे पर्व आहे. जालन्यात प्रथमच अशा स्वरूपाचा भव्य सोहळा होत असून, सर्व रोटरी सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. सुरेश साबू यांनी केले आहे.

# मराठा समाज आरक्षणासह शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती नेमावी

## मराठा महासंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांना साकडे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



मराठा समाजाच्या एसईबीसी आरक्षणासह समाजाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न या मुद्यावर ठोस निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात यावी, यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करावा, अशी मागणी मराठा महासंघाच्यावतीने आ. अर्जुनराव खोतकर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, इंजि. शुभम टेकाळे, मंगेश मोरे, श्रीधर पोथरे, बाबा राऊत, विशाल कोरडे, आकाश जगताप यांनी शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी आ. खोतकर यांना निवेदन दिले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांचीही उपस्थिती होती. या निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने एसइबीसी मराठा आरक्षण अधिनियम २०२४ संदर्भात उच्च न्यायालयात सुनावणी घेण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयास निर्देश दिलेले आहेत. मराठा आरक्षणास अनेक याचिकाकर्त्यांनी विरोधी याचिका दाखल केलेल्या आहेत. ही सुनावनी दि. १८ एक जुलैपासून पासून सुरु झालेली आहे व दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी पुर्ण दिवस अशी सुनावनी होणार आहे. मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण हे विरोधी याचिकाकर्त्यांनी आव्हानित केलेले असून, सन २०२४ चा अधिनियमासही आव्हानित केलेले आहे. याबाबत शासन स्तरावरुन सदर याचिकेच्या सुनावनीबाबत समन्वय ठेवण्यासह याबाबत ज्याकाही अडचणी, आढावा, समस्या, डाटा संकलन, माहिती आवश्यक असते, त्यासाठी शासन स्तरावर मंत्रीमंडळ उपसमिती याचा समन्वय करत असते. आपल्या मागील सरकारच्या काळात मराठा समाजाच्या विविध प्रश्नांसंदर्भात मंत्रीमंडळ उपसमिती नेमली होती. नंतरच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळातदेखील उपसमिती स्थापन केलेली होती. सध्याचे सरकार स्थापन झाल्यापासून मंत्रीमंडळ उपसमिती नेमली नसल्याने आता सदर केसकडे कोणाचेही गांभीर्याने लक्ष नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. सामान्य प्रशासन विभागातील एक अधिकारी फक्त उच्च न्यायालयात हजर राहत आहे. शैक्षणिक प्रवेश, राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती, अण्णासाहेब पाटील महामंडळ कर्ज व्याज परताव्यात होणारा विलंब, वेळेत निर्वाह भत्ता न मिळणे, जात प्रमाणपत्र व पडताळणीमधील विलंब, नॉन क्रिमीलेअर इत्यादी विविध प्रकारचे दाखले अश्या अनेक छोट्या मोठ्या विषयासाठीदेखील विविध खात्यांकडे पाठपुरावा करावा लागतो. कोणताही विषयाची सुरुवात त्या खात्याचे मंत्री महोदयांचे निर्देश, सचिव, सहसचिव कक्ष अधिकारी विभागातून होते व त्याचक्रमाणे उलट कक्ष अधिकारी ते मंत्री व अंतिम दोन उपमुख्यमंत्री, नंतर मुख्यमंत्री इथपर्यंत असते. परिपत्रक, शासन निर्णय काढून घेण्यासाठी एवढा पाठपुरावा करावा लागतो. याशिवाय राज्यामधील विधीमंडळ सदस्य, जिल्हाधिकारी संबंधित विभागाचे अधिकारी यांनाही निवेदने द्यावी लागतात. या सर्व पार्श्वभूमीवर सर्व विषय हाताळणारी मंत्रीमंडळ उपसमिती तातडीने नेमावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# जिल्हाधिकारी म्हणुन आशिमा मित्तल यांनी स्विकारला पदभार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



जालना जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या श्रीमती आशिमा मित्तल यांनी शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ रोजी आपला पदभार स्वीकारला. यापूर्वी त्या नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. नाशिक येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी म्हणुन काम करत असतानी श्रीमती मित्तल यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

मूळच्या राजस्थान राज्यातील जयपूर येथील रहिवासी असलेल्या जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी आयआयटी मुंबई येथून बी.टेक. सिव्हिल इंजिनियरींग केली असुन यामध्ये त्यांना शंकर दयाल शर्मा सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. त्यांनी या क्षेत्रातही काम केले आहे. तसेच त्यांचे मानववंशशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण झालेले आहे. श्रीमती मित्तल यांनी सन २०१७ ची भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा उत्तीर्ण केली असून त्या देशात १२ व्या स्थानी होत्या. २०१८ साली त्या भारतीय प्रशासकीय सेवेत महाराष्ट्र राज्यात रुजू झाल्या आहेत. यापूर्वी त्यांनी नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे आयटीडीपीच्या प्रकल्प अधिकारी म्हणुन काम केले आहे. तसेच अहिल्यानगर येथे प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी म्हणुन कामकाज पाहिले आहे. श्रीमती मित्तल यांनी शालेय दिवसात राष्ट्रीय प्रतिभा शोध चाचणी (छढडए), किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना (घधझध) सारख्या प्रतिष्ठित शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आहेत. त्यांनी प्रशासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी बहुराष्ट्रीय (चछज) कंपनीमध्ये काम केले आहे. सामाजिक सेवेच्या भावनेतून त्यांनी अनेक एनजीओमध्ये सक्रिय सहभाग घेतला असून सामाजिक बदलांबद्दल त्या आग्रही आहेत. त्यातूनच त्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत येण्याची प्रेरणा मिळाली. श्रीमती मित्तल यांच्या संकल्पनेतून सुपर ५० उपक्रमांतर्गत नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दिव्यांग व खुल्या प्रवर्गातील एकूण २०० विद्यार्थ्यांना गएए/उएढ व छएएढ परीक्षांसाठी निवासी स्वरूपाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. यातील २२ विद्यार्थ्यांनी गएए ारळप परीक्षा उत्तीर्ण केली आहे, यातील ७ विद्यार्थ्यांनी गएए रर्वीरपलश परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांचे आयआयटीएन बनविण्याचे स्वप्न पूर्णत्वास आले आहे. राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानात नाशिक जिल्हा हा राज्यात प्रथम आला असून सर्वोत्कृष्ठ कामगिरी बद्दल राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांना प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारतर्फे भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक निमित्त गठीत दि.७ मे २०२५ रोजी श्रीमती आशिमा मित्तल यांचा मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोग यांच्याकडून कुपोषण निर्मूलन व बालकांसाठी राबवलेल्या अभिनव उपक्रमांमुळे सन २०२३ व सन २०२४ असा सलग २ वर्ष बालस्नेही पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. श्रीमती मित्तल यांनी -पींहीेंश्रेसू या विषयात मास्टर्स केले आहे. श्रीमती मित्तल यांचा प्रदीर्घ अनुभव जालना जिल्ह्याच्या विकासासाठी नक्कीच उपयोगी येणार आहे.

# बदनापूरच्या दुर्दशेचा आलेख उंचावतोय

## कचऱ्याचे ढिगारे, गटारमिश्रित पाणी आणि नगरपंचायतीचा बेजबाबदार कारभार

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर/प्रतिनिधी**

बदनापूर शहराची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. नगरपंचायतीच्या बेजबाबदार प्रशासनामुळे शहरात कचऱ्याचे ढिगारे, गटारमिश्रित पाण्याचा पुरवठा, आणि अनागोंदीचा माहोल निर्माण झाला आहे. स्वच्छता मोहिमेचा बडगा फडकवणाऱ्या नगरपंचायतीची प्रत्यक्षातील अवस्था मात्र संतापजनक आहे.

शहराच्या विविध भागांमध्ये कचऱ्याचे ढिगारे साचले असून, घंटागाड्यांच्या खरेदीचा केवळ गवगवा झाला. प्रत्यक्षात त्या गाड्या धूळ खात पडल्या असून, नागरिक दुर्गंधी आणि रोगराईच्या धोक्याशी सामना करत आहेत.



**कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही स्वच्छतेकडे बोटचेपी धोरण!**

शहराला पाणीपुरवठा करणारा मुख्य व्हॉल्व्ह थेट गटारात बुडालेला आहे. परिणामी, महिन्यातून एकदाच येणारे पाणीही गटारमिश्रित होऊन नागरिकांच्या नशिबी येते आहे. या प्रकारामुळे लोकांच्या आरोग्यावर गंभीर संकट निर्माण झाले आहे. पाणीपुरवठ्याची पाईपलाइन ठिकठिकाणी गळती झाली असून, त्याकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे.


## नागरिकांमध्ये वाढता संताप - लवकर सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

» नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे बदनापूर शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. अधिकारी शहरात राहतच नाहीत, घंटागाड्या गायब आहेत, आणि पाण्यात गटार मिसळते आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालावे, अन्यथा जनतेला रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा काँग्रेस जिल्हा सचिव जावेद कुरेशी यांनी दिला.

नगरपंचायत स्थापन होऊन पाच वर्षांचा कालावधी उलटून गेला, पण अधिकारी आणि पदाधिकारी अजूनही खेडेगावाच्या मानसिकतेत अडकले आहेत. आमदार नारायण कुचे यांनी विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला असतानाही शहरात विकासकामे होताना भेदभाव केल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होते आहे. घंटागाड्या, स्वच्छता अभियान, पाणीयोजना यांवर लाखो-कोट्यवधी रुपये खर्च झाले, पण प्रत्यक्षात त्याचा ठोस परिणाम नागरिकांच्या जीवनात कुठेच दिसून येत नाही. बाजारपेठेतील भाजी मंडईचेही नियोजन ढासळले असून, नगरपंचायतीला मूलभूत सोयीसुविधा देण्यात अपयश आले आहे.

# बीडहून नांदेडकडे निघालेल्या शिवशाही आणि ऑटोचा भीषण अपघात

## रिक्षा चालक जागेवरच ठार, संतप्त जमावाकडून बसवर दगडफेक


**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१ ऑगस्ट**

तालुक्यातील पांगरी तांडा परिसरात एक ऑगस्ट रोजी सकाळी नऊच्या सुमारास भीषण अपघात झाला. बीडहून नांदेडकडे जाणाऱ्या शिवशाही एसटी बसने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षाचालक जागीच ठार झाला. या घटनेने परिसरात तणाव निर्माण होऊन काही काळासाठी वाहतूक ठप्प झाली होती.

मृत रिक्षाचालकाचे नाव श्रीनिवास शिवाजी राठोड (वय २३, रा. पांगरी तांडा) असे आहे. त्यांनी रिक्षातून काही प्रवाशांना कामाच्या ठिकाणी सोडल्यानंतर पांगरी रोडने तांड्याकडे परतत असताना शिवशाही बसने ( एमएच ०४ एफएल ०९८८ ) त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षा काही अंतर फरफटत गेल्याने श्रीनिवास राठोड यांचा जागीच मृत्यू झाला.अपघातानंतर संतप्त नागरिकांनी एसटी बसच्या काचा फोडल्या. घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवाशांनीही घटनास्थळी उतरून मदतीचा हात दिला. दरम्यान, परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मजहर सय्यद, उपनिरीक्षक शेख, सहाय्यक फौजदार लक्ष्मण टोले, जमादार दत्ता उबाळे, रमेश तोटेवाड, सुनील अन्नमवार आदींनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत वाहतूक सुरळीत केली व परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेची नोंद परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात येत असून, पुढील तपास सुरू आहे.




साहित्य सम्राट लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा अनु–जाती जमाती संघर्ष समितीचे अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून अभिवादन रॅली व क्रांती मशाल रॅली काढून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मा.आ.राजेंद्र जगताप, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, किसन तांगडे, अशोक लोढा, प्रकाश कानगावकर, अजय सवाई, शेख निजाम, दादा हातागळे, विकास बामणे, मायताई मिसळले, रेश्मा ताई जोगदंड, शोभा गलांडे, महेश आठवले, बापू पवार, शेख खदीरभाई, नागेश अण्णा दुबळे, प्रभाकर चांदणे,अविनाश जोगदंड, यांच्यासह हजारो कार्यकर्ते अभिवादन रॅलीत सामील झाले होते.**(छाया–कृष्णा शिंदे)**

## गणेश गायकवाड यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ ऑगस्ट**

तालुक्यातील आनंदगाव येथील रहिवाशी गणेश संभाजी गायकवाड वय ५८ वर्ष यांचे हृदयविकाराचा तीव्र धक्क्याने बुधवार सायंकाळी हैद्राबाद येथे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आनंदगाव येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुले ,दोन मुली, चार भाऊ, जावई असा मोठा परिवार आहे.बप्पा म्हणून ते सर्वपरिचित होते.ते माजी सरपंच ज्ञानेश्वर गायकवाड,बाबासाहेब गायकवाड यांचे बंधू होत



# अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परीक्षेत डॉ प्रगती चौधरी भारतात ५ वी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१ ऑगस्ट**

शहरातील माणिकनगर भागातील प्रगती बालासाहेब चौधरी आपल्या अत्यंत गरीब, कठीण परिस्थितीतून वडीलांचे छत्र हरवल्यानंतरही मेहनत व कष्टाने डॉक्टर बनली व आता एमडीसाठी घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परीक्षेत भारतात ५ वी आली आहे. याबदल येथील तेली समाज व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने तिचा शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.



शहरातील माणिकनगर परिसरात चौधरी कुटुंब राहते. या कुटूबातील सदस्य घरची परिस्थिती बेताची असल्याने इतरत्र काम करतात. याच कुटुंबातील बालासाहेब चौधरी हे मंडप डेकोरेशनचा व्यवसाय सुरू केला. व्यवसायात जम बसवत असतानाच अगदी तरुण वयातच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. बालासाहेब यांना एक मुलगी, एक मुलगा होता. तिचा व कुटूंबाचाभार आई ज्योती चौधरी यांच्यावर आला. ज्योती यांनी आपल्या मुलाला व मुलीला शिक्षणासाठी काही कमी पडणार नाही याची काळजी घेतली. प्रगतीचे १ ते १० वी पर्यंतचे शालेय शिक्षण शहरातील फाउंडेशन हायस्कूलमध्ये पूर्ण झाले. याच काळात वडीलांचा मृत्यू झाला. घरच्या कठीण परिस्थितीमुळे पुढील शिक्षण पूर्ण करता येईल का नाही तसेच प्रगतीने डॉक्टर बनण्याचे ध्येय ठरवले होते. पण वडीलांच्या मृत्यूमुळे हे पूर्ण होईल का नाही ? असा प्रश्न निर्माण झाला होता. पण जिद्द, कष्ट व मेहनतीने पुढील शिक्षण पूर्ण केले. १० वी नंतर उच्च माध्यमिक शिक्षणासाठी देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश घेतला. याच ठिकाणी सीईटी व वैद्यकीय प्रवेशासाठी असलेली नीट परिक्षेची तयारी सुरू केली. २०१८ मध्ये शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव येथे बीएएमएससाठी प्रवेश मिळाला. २०२४ मध्ये आपल्या आई व कुटुंबातील सदस्यांच्या सहकार्याने अत्यंत कष्टाने, मेहनतीने, चिकाटीने आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करुन डॉक्टर बनण्याचे ध्येय साध्य केले. यानंतर डॉ प्रगतीने एमडी होण्यासाठी असलेल्या अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश दिली. या परीक्षेचा निकाल बुधवारी (ता.३०) लागला असून डॉ प्रगती या परिक्षेत भारतात ५ वी आली आहे. याबदल डॉ प्रगतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. याबदल येथील तेली समाज व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने तिचा शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे, शनैश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवशंकर जठार, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे नांदेड विभागाचे उपाध्यक्ष प्रा प्रविण फुटके, ईश्वर राऊत, गोकुळ चौधरीसह आदी उपस्थित होते.

यासंदर्भात डॉ प्रगती बालासाहेब चौधरी यांनी सांगितले की, माझ्या अनुभवातून एवढेच सांगू इच्छिते की परिस्थिती प्रतिकूल जरी असेल तर जिद्द व चिकाटी ने कुठे ही न थकता त्यावर मात करून आपला मार्ग आपणच तयार करावा लागतो यश आपोआप मिळते.

# श्रमिकांचा कवी अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांना अभिवादन

## अण्णाभाऊ शोषित वंचित आणि समाज क्रांतीचे प्रतीक–ॲड.मनोज संकाये



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१ ऑगस्ट**

शोषित–वंचितांच्या आवाजासह सामाजिक क्रांतीचे प्रतीक ठरलेले लोककवी अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती तसेच लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी परळी शहरात अत्यंत उत्साहात आणि अभिमानाने साजरी करण्यात आली. ॲड. मनोज संकाये मित्रमंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या परळी येथील बस स्टँड समोरील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमात ॲड. मनोज संकाये यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे स्मरण करून, त्यांनी दिलेल्या सामाजिक समतेच्या संदेशाचे महत्त्व पटवून दिले. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून आणि आंदोलनातून वंचितांचा आवाज बुलंद केला. त्यांच्या विचारांनी आजही अनेकांना प्रेरणा दिली आहे, असे संकाये यांनी नमूद केले.कार्यक्रमात युवकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. पुतळा परिसर फुलांनी आणि फडकत्या झेंड्यांनी सजवून, जयघोषात साजरी झालेली ही जयंती, अण्णाभाऊंच्या सामाजिक लढ्याची आठवण करून देणारी ठरली.यावेळी अनिल चौधरी, वैजनाथ केंद्रे, शिरीष सलगरे, प्रवीण रोडे, संतोष कांबळे,राजू वायबसे, अविनाश नागरगोजे, अजय मुंडे, शिवलिंग सलगरे, देवदास मुंडे ,वसंत मुंडे, परमेश्वर मुंडे,महादेव कांदे, वैजनाथ कांबळे, बालू गित्ते,अनिल कातकडे,विनोद रोडे,मुकुंद पारधे,अंकुश रोडे,अवि गायकवाड,विजय गवळी आदीसह मित्रमंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयांमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त बालसभेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.१ ऑगस्ट**

बालसभा म्हणजे विद्यार्थ्यांचे व्यासपीठ विद्यार्थ्यांच्या बालमनावर सुसंस्कार व्हावेत यासाठी कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयांमध्ये आज लोकमान्य बाल गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने इ. ३री च्या विद्यार्थ्यांनी बाल सभेचे आयोजन केले होते.

या बाल सभेच्या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून विद्यार्थी विक्रांत माळोदे, प्रमुख अतिथी कु. प्रियंका खंदारे, प्रमुख उपस्थिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी, विभाग प्रमुख रागिनी जोशी ताई, बाल सभा प्रमुख सुवर्ण ताई खानापूरकर उपस्थित होते. व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन व मान्यवर व विद्यालयातील सर्व शिक्षकवृंदांचे सहर्ष स्वागत करून बालसभेत सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी ओम गीतखाने याने केले व बालसभा म्हणजे काय व त्याची उद्दिष्ट उपस्थितांना सांगितले. यावेळी विद्यार्थी भाषण इ. १ ली शिवण्या टिंगळे, इंद्रायणी मुळे, इ २ री गुंजन मस्के,श्रीराज शेटे,अनया भाकरे,इ. ३री स्वरा गिरी,ओम गीतखाने,ओम वावरे,तृप्ती घोडके, रूपा जाडकर, इ ४थी अर्पिता तांबे, समर्थ पठाडे, ब्राह्मणी जानवे,स्वरूप मुळे,वैष्णवी बारहाते,पुनम सोनवणे,शिवकन्या भोसले,वैष्णवी चोथे, भूमी वाघ,श्रद्धा पिंगळे,अर्पिता लिहिणार,अदिती राठोड यांनी सादर केली.यावेळी प्रमुख अतिथी विद्यार्थिनी प्रियंका खंदारे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप विद्यार्थी विक्रांत माळोदे यांने केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भाषणांवर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्याने अचूक सादर केली. या बालसभेच्या यशस्वीतेसाठी वर्गशिक्षक सुवर्णलता खानापूरकर व गणराज जाधव यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी पद्य गीत सादर विद्यार्थिनी स्वरा गिरी व आरोही डोंबे यांनी केले. या विद्यार्थी बाल सभेचे सूत्रसंचालन विद्यार्थी अर्पित गव्हाणे व ऋणनिर्देश विद्यार्थी रुद्रा जाडकर यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक प्रदीप जोशी यांनी सर्व भाषण सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांची गोड कौतुक केले. व बालसभेचे उत्कृष्ट नियोजन केले याबद्दल मत व्यक्त केले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाल सभेची सांगता शांती मंत्राने करण्यात आली.




## लवाद न्यायाधिकरण

**(लवाद - ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम.ए (एम.सी. जे). एम कॉम, एल.एल.बी)**

**एकल लवाद न्यायालय**

**लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर**

**प्लॉट नं. ९४/६६, मित्रनगर, रब्बी रिसर्च सेंटरचे मागे, शेळगी, सोलापूर-४१३००६**

**जाहिर प्रगटन जिल्हा - बीड**

या जाहिर नोटीसीने खाली दिलेल्या सामनेवाले यांना कळविण्यात येते की, दावेदार **लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर** या संस्थेने खाली नमुद कर्जदार, जामीनदारांविरुध्द थकीत कर्जाची रक्कम वसुली ऑवार्ड मिळणेकामी लवाद न्यायालयाकडे दावे दाखल केले असून, कर्जदार जामीनदार यांनी दिलेल्या अधिकृत, नोंद पत्यावर लवाद न्यायालयाकडून पाठविलेल्या (आर.पी.ए.डी.ने) लवाद दाव्याचे नोटीसा रजिस्टर पोस्टाने न बजावता परत आले आहे.

न्यायाच्या दृष्टीने संबंधित कर्जदार व जामिनदारांना योग्य संधी देऊन न्याय निवाडा करणेकामी हि जाहिर नोटीस प्रसिध्दीस दिली आहे. खालील नमूद सामनेवाले यांची पुढील निर्देशित तारखेपूर्वी दि. ११/०८/२०२५ रोजी अथवा तारखेस वर नमूद पत्यावर लवाद न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी म्हणणे न मांडल्यास एकतर्फी न्यायनिवाडा करण्याचे सुचित करत आहे.

| अ. क्र. | लवाद दावा क्र व दिनांक | नाव | | शाखा | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लवाद दावा क्र. १९९/२०२१ | अमोल अर्जुनराव सोनवणे | कर्जदार | बीड विलीनीकरण शेळगी | रा. मु. पो. न्यू आदर्श, गणेश नगर, नगर रोड, रेस्ट हाऊस च्या मागे, जि बीड- ४३११२२ | १,०७,८३८ |
| | ११/०८/२०२५ | दिलीप बाबुराव वाव्हूळ (मयत) सविता दिलीप वाव्हूळ (वारस) | जामिनदार | | रा. मु. पो. स्नेह नगर, सुभाष रोड, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | |
| | | भास्कर किसनराव सोनवणे | जामिनदार | | रा.मु. पो, गणेश नगर, नगर रोड, ता. बीड, जि. बीड-४३११२२ | |

येणे प्रमाणे जाहिरनोटीस प्रसिध्द केली. ता.३०/०७/२०२५

सही
**लवाद अधिकारी**
ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम.ए (एम.सी. जे) एम कॉम. एल.एल.बी

# शहरातील रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करा :शिवेंद्रसिंहराजे भोसले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ ऑगस्ट -**

शहरातील रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करताना मनपा व सार्वजनिक बांधकाम विभागांनी समन्वय ठेवून रस्त्यांची कामे पूर्णत्वास न्यावेत, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले. आज शासकीय विश्रामगृहातील बैठक कक्षात त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत विविध विकास कामांचा आढावा घेतला, यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधिक्षक अभियंता संभाजी धोत्रे, कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, परभणीचे कार्यकारी अभियंता प्रशांत कोरे, हिंगोलीचे कार्यकारी अभियंता दिंगाबर पोत्रे, भोकर कार्यकारी अभियंता विशाल चोपडे, देगलूरचे कार्यकारी अभियंता संदीप कोटलवार आदींची उपस्थिती होती.

शहरातील रस्त्यांची कामे करताना नागरिकांना त्रास होता कामा नये, याची दक्षता घेवून मनपा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी एकमेकात समन्वय ठेवून कामे तात्काळ पूर्ण करण्यावर भर द्यावा तसेच जिल्ह्यात वृक्ष लागवडीसोबतच वृक्ष संवर्धनावर भर द्यावा असे निर्देश भोसले यांनी दिले.

काही तालुक्यातील रस्ते खूपच खराब झाले आहेत. वर्दळ, देवस्थान अशा ठिकाणच्या रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देवून ती कामे वेळेत पूर्ण करा. जिल्ह्यातील जे रस्ते दरवर्षी दुरुस्ती करावी लागतात अशा रस्त्यांना दुरुस्त करताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर द्या, असे त्यांनी स्पष्ट केले.

रस्त्यावर दिशादर्शक फलक लावणे, पोलीस वसाहतीच्या इमारतीचे दुरुस्ती व इतर कामे पूर्ण करावेत. किनवट-हदगाव रस्त्यांची कामे, नांदेड शहरातील चौकांचे सुशोभिकरण, शिवाजीनगर भागातील ड्रेनेजची कामे, टोल नाक्यावरील बोगस पावत्या इत्यादी महत्वाचे विषय लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत त्यांनी संबंधिताना सूचना दिल्या.

शासनाच्या १०० दिवसांच्या मोहिमेत सार्वजनिक बांधकाम विभागाने चांगले काम केले असून आता १५० दिवसांच्या मोहिमेत विभाग अव्वल राहील यांची दक्षता प्रत्येकांने घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधिक्षक अभियंता संभाजी धोत्रे यांनी नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यातील प्रस्तावित विकास कामांची माहिती व विभागातील मनुष्यबळ, पदभरती याबाबतची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

**तख्त सचखंड श्री गुरुद्वाराचे घेतले दर्शन**

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथे जाऊन गुरुग्रंथ साहिब यांचे दर्शन घेतले. तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा बोर्डाच्यावतीने त्यांचा पारंपरिक पद्धतीने केसरी चोला, शिरोपा देवून सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**न्यायालय नवीन इमारतीच्या कामाची केली पाहणी**

नांदेड येथे कौठा-असर्जन भागात न्यायालयाच्या नवीन इमारतीचे काम प्रगतीपथवर असून या इमारतीच्या कामाची पाहणी करुन या इमारतीच्या कामाचा आढावा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतला. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त बाऱ्हाळी येथे वृक्षारोपण

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी,दि. १ ऑगस्ट -**

भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी वने व सांस्कृतिक मंत्री आमदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त बा-हाळी येथे आर्यवैश्य समाजाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

आर्यवैश्य महासभेच्या वतीने विविध सामाजिक, आरोग्यदायी उपक्रम राबविले जात असतात यावर्षी भाग्यलक्ष्मी पेट्रोलियम येथे विविध वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. यावेळी मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग महाजन आर्य वैश्य महासभेचे जिल्हा बांधकाम समितीचे सदस्य राजेश महाजन, बालाजी सोमवार, सतीश महाजन ,श्रीरंग काशेटवार, गजानन महाजन ,अक्षय महाजन, नामदेव गोरशेटवार , अशोक महाजन यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.




# सर्वसामान्यांचे नेतृत्व ; आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

आजकालच्या बदलत्या राजकीय व्यवस्थेमध्ये लोकांशी थेट संवाद साधणारे, त्यांच्या अडचणी समजून घेणारे आणि विकासाचा ठोस आराखडा उभा करणारे नेते फार थोडे आहेत. या विरळ होत चाललेल्या संख्येत जे नाव आदराने घेतले जाते, ते म्हणजे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर. त्यांच्या जन्मदिवसानिमित्त आज त्यांचा राजकीय, सामाजिक आणि व्यक्तिगत प्रवास उलगडून पाहणे ही एक प्रेरणादायी गोष्ट ठरेल.

प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांच्यात सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि जाणीवशीलता होती. शिक्षण घेत असतानाच त्यांनी समाजकार्यात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या अभ्यासू, निग्रही आणि ठाम स्वभावामुळे त्यांनी अल्पावधीतच स्थानिक राजकारणात आपले स्थान निर्माण केले.ग्राम पंचायत ते लोकसभा असा यशस्वी राजकारणाचा पल्ला त्यांनी गाठला. या प्रवासात त्यांना अनेकवेळा संघर्ष करावा लागला. पण खचले नाहीत. थांबले नाहीत. कुणाचा द्वेष केला नाही. वडील शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांचा समाजसेवेचा वसा घेऊन लोककल्याणासाठी निघालेल्या चिखलीकर यांचा जिवलगांचा गोतावळा प्रचंड जमला आहे. प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होणारे साहेब हे खरे लोकसेवक आहेत. त्यामुळे जनता त्यांच्या पाठीशी कायम राहिली आहे.



राजकारण हे केवळ निवडणुकांचे माध्यम नसून, ते जनतेच्या समस्या जाणून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न असतो, हे त्यांनी सुरुवातीपासूनच समजून घेतले होते. याच न्यायाने ते काम करतात. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे जनतेशी त्यांचे असलेले थेट, प्रामाणिक आणि हृदयस्पर्शी नातं. त्यांनी कधीही राजकारणाला केवळ सत्तेच्या दृष्टिकोनातून पाहिले नाही. त्यांच्या प्रत्येक भेटीत, दौऱ्यात किंवा भाषणात एक गोष्ट स्पष्ट दिसते ते माणसाला केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतात.जनता माझी मी जनतेचा हा त्यांना आपुलकीचा गोडवा प्रत्येकाला आपला करीत असतो.

आ. चिखलीकर हे नेहमीच जमिनीवर उतरून काम करणारे नेता म्हणून ओळखले जातात. गावागावातील अडचणी, शेतकऱ्यांचे प्रश्न, युवकांच्या संधी, महिलांची सुरक्षा हे सारे मुद्दे त्यांच्यासाठी फक्त घोषणांचे विषय नसतात, तर ते त्यांच्या कृतीचा भाग असतात.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विकासाचा आराखडा आखताना केवळ शहरी भागांपुरता मर्यादित राहिलेलं नाही. ग्रामीण भागातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य केंद्रे, शिक्षण संस्था यांसारख्या मूलभूत गरजांवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. कंधार लोहा विधानसभा मतदार संघाला सिंचनाखाली आणण्यासाठी लिंबोटी धरणाची निर्मिती त्यांनी केली. आमदारकीच्या एकच कालावधीत धरण उभारण्याची किमया साधणारे ते एकमेव आमदार ठरले आहेत. शेतकरी सुखी झाला पाहिजे ही त्यांची धारणा राहिली आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांना कृषी सिंचनासाठी मुबलक पाणी मिळत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने शेतकरी संपन्न होणार नाही . या जाणिवेतून या भूमिपुत्राने आणि शेतकरी पुत्र आणि लिंबोटी सारखे धरण उभारून हजारो शेतकऱ्यांना सुखाचा मार्ग दाखवला आहे.

कोरोना महामारी, पावसाचे अतिवृष्टीसारखे संकट किंवा इतर सामाजिक आपत्ती अशा प्रत्येक वेळेस चिखलीकर हे स्वतः पुढे येऊन संकटाचे व्यवस्थापन करताना दिसले. त्यांनी स्वतःच्या कार्यकर्त्यांना आणि प्रशासनाला सोबत घेऊन संवेदनशीलतेने आणि गतिशीलतेने कार्य केले. संकटांना सामोरे जाताना त्यांनी लोकांमध्ये धीर निर्माण केला आणि मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल केवळ मतदारसंघापुरतीच मर्यादित न राहता, राज्यपातळीवरसुद्धा घेतली गेली. प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुटुंबातील सदस्य समजून त्याच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी धावून येणारे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे जिल्ह्यातील एकमेव नेते ठरतात . लोहा कंधार विधानसभा मतदारसंघ म्हणजे माझे कुटुंब आणि या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती माझ्या कुटुंबातील सदस्य ही आत्मीय भावना जपणारे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे खऱ्या अर्थाने आपल्या हक्काचा माणूस ठरतात.

राजकारणासोबतच आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे शैक्षणिक संस्था, क्रीडा संघटना आणि सामाजिक सेवाभावी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि नवयुवकांना त्यांच्या मुळांशी जोडण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रमांना चालना दिली आहे. त्यांनी उभारलेल्या संस्थांमधून शेकडो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली आहे, आणि अनेक गरजू कुटुंबांना आरोग्य, आर्थिक मदत, व सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यात आली आहे.

नेतृत्वात यशस्वी होण्यासाठी केवळ धोरणे पुरेशी नसतात, तर स्वतःच्या चारित्र्याची आणि मूल्यांची मोठी भूमिका असते. आ. चिखलीकर हे स्वच्छ प्रतिमा, नम्र स्वभाव, आणि प्रामाणिक विचार यामुळे एक आदर्श नेता म्हणून समाजात प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपली राजकीय कारकीर्द ही सत्य, सेवा आणि समर्पण यांच्यावर उभी केली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये त्यांच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली आहे.खासदार म्हणूनही त्यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले होते . नांदेड जिल्ह्यातील अनेक महत्त्वाचे प्रश्न, रेल्वेचे प्रश्न त्यांनी मार्गी लावले. लोककल्याण आणि जणविकास हाच त्यांचा ध्यास राहिला आहे. गोरगरिबांपासून ती श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या या नेतृत्वाचा आज वाढदिवस. अशा प्रेरणादायी नेतृत्वाचा वाढदिवस साजरा करताना, त्यांच्या कार्यात भरभराट व्हावी, त्यांना उत्तम आरोग्य लाभावे आणि त्यांच्या माध्यमातून आपल्या समाजाला, भागाला, राज्याला विकासाचे नवे वळण लाभो, हीच मन:पूर्वक शुभेच्छा!

**मारोती जाधव**
**स्वीय सहाय्यक**




## जागतिक मानवी तस्करी विरोधी दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड,दि. १ ऑगस्ट -**

जागतिक मानवी तस्करी विरोधी दिनानिमित्त,महिला व बाल विकास विभाग जिल्हा बाल संरक्षण कक्ष चाईल्ड लाईन व जनसेवा ग्रामीण विकास व शिक्षण प्रतिष्ठान याच्या संयुक्त विद्यमानाने नांदेड जिल्हामध्ये एक अभिसरण कार्यक्रम आज घेण्यात आला. ज्यामध्ये बाल संरक्षण आणि बाल हक्क परिसंस्थेतील प्रमुख ,सर्व विभाग एकत्र आले होते. बाल तस्करीशी लढण्यासाठी समन्वित, आंतर-एजन्सी कृती आवश्यक आहे हे एकत्रितपणे ओळखून संवादात सहभागी झालेल्या प्रतिनिधींनी या कार्यक्रमात भाग घेतला.




## तुप्तेवार यांची राष्ट्रीय जन स्वास्थ प्रशिक्षणासाठी निवड

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर,दि. १ ऑगस्ट -**

हिमायतनगर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोर्डी अंतर्गत आयुष्मान आरोग्य मंदीर सिंरजनी येथे कार्यरत असलेल्या आरोग्य सेविका लक्ष्मी निळकंठ तुप्तेवार यांची निवड राष्ट्रीय जन स्वास्थ प्रशिक्षण एवं अनुसंधान संस्थान खेतवाडी ,गिरगाव मुंबई येथे Post Graduate Diploma in community Health Care ( PGDCHC ) २०२५-२०२६ या एक वर्षीय कोर्स साठी निवड झाली आहे निवडीबदल तालुका आरोग्य अधिकारी डॉ. धमप्पाल मुनेश्वर , प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत देशमुख,डॉ. सरकुंडे आदींनी अभिनंद केले आहे.

